मंगळवार, २२ नोव्हेंबर २०२२
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१०१
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● TUESDAY 22 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-101 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# माझी लायकी नाही, मी सेवक

## पंतप्रधानांचे काँग्रेसला 'लायकी'च्या वक्तव्यावर प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदाबाद : सध्या गुजरात विधानसभा निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला आहे. सर्वच पक्षांकडून गुजरात निवडणुकीत नागरिकांसाठी आश्वासनांची खैरात वाटली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी सुद्धा गुजरात निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. सोमवारी सुरेंद्रनगर येथे बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसला लक्ष्य केले. मला गटारीतला किडा, नीच आणि मृत्यूचा व्यापारी, मोदींची लायकी दाखवू म्हणतात, अहो तुम्ही राजघराण्यातील आहात, मी सामान्य कुटुंबातील आहे. माझी कोणतीही लायकी नाही. माझी लायकी दाखवू नका, मी एक सेवक आहे, सेवकाला लायकी नाही, असा पलटवार पंतप्रधान मोदींनी काँग्रेसवर केला.**



पंतप्रधान पुढे म्हणाले की, माझी लायकी सांगण्यापेक्षा विकासावर बोला. माझ्या अपमानाला मी दुर्लक्षित करतो. कारण, मला देशाचा विकास करायचा आहे. देशातील १३५ कोटी जनतेसाठी काम करायचे आहे, त्यामुळे मी अपमानाला दुर्लक्ष करतो, असे पंतप्रधान मोदींनी म्हटले. 'भारत जोडो यात्रे'मध्ये नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या ज्येष्ठ समाजसेविका मेधा पाटकर सहभागी झाल्या. यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टीका केली आहे. काँग्रेसचे नेते जेव्हा तुमच्याकडे मते मागायला येतील, तेव्हा गुजरातमधील नर्मदा धरणास विरोध करणाऱ्यांसह तुम्ही पदयात्रा काढत आहात, याबद्दल त्यांना जाब विचारा. कच्छ आणि काठियावाड (सौराष्ट्र प्रांत) यांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी नर्मदा प्रकल्प हा एकमेव उपाय होता. सरदार सरोवर धरण विरोधी असलेल्या महिलेसोबत काँग्रेसचा नेता कसा पदयात्रा काढत होता, हे तुम्ही पाहिले असेलच. या धरणविरोधी महिला नेत्यासह इतरांनी कायदेशीर अडथळे निर्माण करून तीन दशके प्रकल्प रखडवला, असा आरोप पंतप्रधान मोदींनी केला आहे.

### इंदिरा गांधींचा पराभव होऊ शकतो तर मोदींचा का नाही?

मेघालयचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला आहे. सत्ता येते आणि जाते, सत्ता ही स्थायी नसते हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समजून घ्यावे असे मलिक यांनी म्हटले. इंदिरा गांधी यांना सत्तेवरून कोणीच हटवू शकत नाही असे लोक म्हणायचे. पण, त्यांचीदेखील सत्ता गेली. त्यामुळे परिस्थिती चिघळेल असे काही करू नये असे मलिक यांनी म्हटले. मलिक यांनी जयपूरच्या राजस्थान विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या एका कार्यक्रमात उपस्थित राहून मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले की, देशात वेगवेगळ्या पातळीवर लढाई सुरू होणार आहे. शेतकऱ्यांनी पुन्हा एकदा आंदोलन सुरू केले. तर, युवकदेखील केंद्र सरकारविरोधात आंदोलन पुकारतील असेही त्यांनी म्हटले. मलिक यांनी म्हटले की, इंदिरा गांधी यांचीदेखील सत्ता गेली होती. त्यांची सत्ता जाणार नाही, असे लोक म्हणायची. सध्या मोदी यांच्या नेतृत्वातील सत्ता जाणार नाही असे लोक म्हणत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी समजून घ्यावे की सत्ता कायमस्वरुपी राहत नाही. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाईल एवढी अराजकता निर्माण करू नका, असे मलिक यांनी म्हटले.

**अग्निपथ योजनेवर प्रश्नचिन्ह :** सत्यपाल मलिक यांनी सैन्य भरतीसाठी सुरू असलेल्या 'अग्निपथ' योजनेवरही त्यांनी केंद्र सरकारवर टीकेची झोड उठवली. केंद्र सरकारच्या या योजनेमुळे भारतीय लष्कर कमकुवत होईल. तीन वर्षाचीच सेवा असल्याने देशासाठी बलिदान देण्यासाठी असलेली भावना संपून जाईल. देशासाठी सर्वस्व अर्पण करण्यासाठी तरुणांची असलेली प्रतिबद्धता, भावना तीन वर्षांच्या सेवा काळात दिसून येणार नसल्याचे त्यांनी म्हटले. मलिक यांनी पुढे म्हटले की, मला मिळालेल्या माहितीनुसार, अग्निवीरांना लष्करातील ब्रह्मोससह इतर क्षेपणास्त्रे, शस्त्रे यांना हाताळण्यासही मनाई असणार आहे. त्यामुळे ही अग्निपथ योजना भारतीय लष्करासाठी घातक आहे.

## महत्वाची बातमी

### ९६ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात पुस्तक प्रकाशन व्यासपीठ

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त वर्धा येथे दि . ३, ४ आणि ५ फेब्रुवारी २०२३ या दिवसांमध्ये आयोजित होणाऱ्या ९६ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित कार्यक्रमात पुस्तक प्रकाशन व्यासपीठ उभारण्यात येणार आहे. या व्यासपीठाला साहित्य क्षेत्रातील मान्यवर दिवंगत साहित्यिकाचे नाव देण्यात येणार असून या ठिकाणी सुमारे पाचशे श्रोते बसू शकतील अशी व्यवस्था करण्यात येणार आहे. या व्यासपीठावर मान्यवर साहित्यिकांच्या शुभहस्ते पुस्तक प्रकाशनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. या व्यासपीठावरून ज्या लेखक, कवींना आपली पुस्तके प्रकाशित करावयाची असतील त्यांना आयोजक संस्थेने निर्धारित केलेले शुल्क भरून आपल्या पुस्तकांचे प्रकाशन करता येईल. आपल्या पुस्तकाचे प्रकाशन या व्यासपीठावरून व्हावे असे ज्या लेखक, कवींना वाटत असेल त्यांनी आधी आयोजकांकडे तशी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीच्या आणि प्रकाशन शुल्काच्या संदर्भात इच्छुक लेखक, कवींनी विदर्भ साहित्य संघाचे कार्याध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे (९८२२२३०७४३) आणि सरचिटणीस विलास मानेकर (९४२२१०४२५२) यांच्याशी संपर्क साधावा, असे विदर्भ साहित्य संघातर्फे कळविण्यात आले आहे.

# मविआने राबवलेली योजना शिंदे सरकारच्या काळात बारगळली

## कुंपणानेच शेत खाल्ले : कामचुकार कृषी विभागावर कृषी आयुक्तांकडून कारवाई होणार का?

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**उस्मानाबाद :** शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होण्यासाठी राज्य शासनाने सन 2022-23मध्ये"राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर गळीतधान्य उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना" राबविली आहे. सदर योजनेअंतर्गत तेलबिया पिकांखालील क्षेत्र व उत्पादकता वाढ, मूल्य साखळी वृद्धी हे उद्दिष्ट समोर ठेवूनच त्यासाठी सोयाबीन व इतर गळीत धान्य आधारित पद्धती त्यांना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे हा मूळ उद्देश राज्य शासनाचा होता. मात्र कृषी विभागाकडून या योजनेला सरळ सरळ केराची टोपली दाखवण्यात आलेली आहे.

सन 2022-23 ते 2024-25 या कालावधीत जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादकता वाढवण्यासाठी उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये एकूण 43 प्रकल्प राबविण्यात येणार आले आहेत. एक प्रकल्प 100 हेक्टर क्षेत्र प्रमाणे राबविण्यात येणार असून 43 प्रकल्प साठी 4 हजार 300 हेक्टर क्षेत्रावरील 7054 शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होणार होता मात्र कृषी विभागाच्या दिरंगाईमुळे सोयाबीन प्रमाणेच ही योजना सुद्धा पाण्यातच गेली काय असेच शेतकऱ्यांना वाटू लागले आहे.

सदर योजनेअंतर्गत सोयाबीन व इतर गळीत धान्य पिकातील मूल्य साखळीला चालना देणे. या उद्देशाने राज्य शासनाकडून सोयाबीन उत्पादक योजनेसाठी निवड झालेल्या 7054 शेतकऱ्यांना हेक्टरी 6500 रुपये अनुदान देण्यात येणार आहे. ही सोयाबीन उत्पादकता वाढण्यासाठी शासनाकडून यावर्षी उस्मानाबाद



जिल्ह्यामध्ये 2 कोटी 79 लाख 50 हजारावर खर्च होणार आहे. त्यापैकी प्रति लाभार्थी शेतकरी तीनशे रुपये हे माती परीक्षणासाठी खर्च होणार असून याच योजनेमधील लाभार्थी शेतकऱ्यांच शेतातील सोयाबीन निघून त्यात शेतात गहू ज्वारी हरभरा कोळपणीची सुरुवात झाली तरीही अजून सोयाबीन पेरणी अगोदर मिळायला हवे असलेले माती परीक्षण रिपोर्ट आलेच नाहीत. माती परीक्षणासाठी शासनाकडून मिळणारे 12लाख 90 हजार मातीतच गेले आहेत. तर यामुळे राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना ही झोपी गेलेल्या कृषी विभागामुळे सदर योजनेच्या तीन तेरा वाजले आहेत. कारण बहुतांश कृषी सहाय्यकांना मूल्य साखळी विकास योजनाच समजलेलीच नाहीये. कृषी विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाकडून जसा आदेश असेल त्याच पद्धतीने शेतकऱ्याकडून कागद गोळा करायला सुरू केले गेले. अवघ्या दोन-तीन महिन्यात रब्बी हंगाम सुद्धा संपेल तरीही खरिपातील माती नमुने मातीतच माती नमुने परीक्षण अहवाल शेतकऱ्यांना पेरण्या अगोदर मिळाले असते तर शेतीला हवे ते अन्नद्रव्य आणि त्याच प्रमाणात शेतकऱ्यांनी रासायनिक खतांची मात्रा शेतीला देत, रासायनिक खतावरील अतिरिक्त खर्च कमी करत उत्पन्नात वाढ झाली असती. एकात्मिक सोयाबीन आणि इतर गळीत धान्य उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना काय आहे? या प्रकल्पामध्ये निवड झालेल्या शेतकऱ्यांनी माती परीक्षणानुसार सोयाबीन पिकास खताची मात्रा देत बीबीएफ पेरणी यंत्राने पेरणी करणे किंवा टोकन पद्धतीने सोयाबीन पेरणी करून

> सोयाबीनसाठी कीटकनाशक व सूक्ष्म अन्नद्रव्य फवारणी केलेली त्या त्या रकमेची बिले कृषी विभागामार्फत घेण्यात आली मात्र अजून योजनेबद्दल निधीचे काहीच माहित नाही.
> **(शेतकरी माणिक विश्वनाथ कोल्हे)**
> सोयाबीन पेरणी अगोदर माती परीक्षण साठी दिली आहे आज ज्वारी कोळपण्यास सुरु आहे .तरी अजून माती परीक्षण रिपोर्ट आले नाहीत.
> **(गणेश मधुकर नाईकवाडी,शेतकरी उस्मानाबाद)**

त्यानंतरच्या सोयाबीन वाढीच्या कालावधीमध्ये कृषी सहायकाच्या मार्गदर्शनानुसार योग्य वेळी योग्य प्रमाणात सोयाबीन विकास सूक्ष्म अन्नद्रव्य व कीटकनाशकाची फवारणी करणे व संबंधित फवारणीसाठी लागणारा खर्च च्या बिलाच्या पावत्या कृषी विभागात जमा करून कृषी विभागामार्फत संबंधित शेतकऱ्याला त्या बिलापोटी रक्कम अदा करणे हाच मूळ उद्देश राज्य शासनाचा होता. संपूर्ण योजना कृषी विभागाच्या नाकर्त्यापणामुळे कागदावरच राहिल्याने संबंधितांवर कारवाई व्हावी हीच मागणी शेतकऱ्यांमधून जोर धरू लागलेली आहे. या योजनेच्या स्वरूपातून जरी शेतकऱ्यांना माहिती मिळाली असती तर आज गोगलगाय, येल्लो मोझ्याकवर नियंत्रणासाठी यश आले असते.

# लोकशाही नव्हे, ही तर उद्धव ठाकरे यांची पक्ष वाचविण्याची धडपड!

## भाजपा मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये

आधुनिक केसरी न्यूज

जनादेशाची पर्वा न करता सत्ता मिळविताना लोकशाहीचे सामान्य संमकेत झुगारणाऱ्या उद्धव ठाकरेंना आता सत्ता आणि पक्षदेखील हातातून निसटल्यावर लोकशाही वाचविण्याचा साक्षात्कार व्हावा हा महाराष्ट्राच्या राजकारणातील सर्वात मोठा विनोद आहे, अशी घणाघाती टीका प्रदेश भारतीय जनता पार्टीचे मुख्य प्रवक्ता केशव उपाध्ये यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. ज्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही, जे हिंसाचार माजवितात आणि ज्यांनी सातत्याने मानवी हक्कांची पायमल्ली करण्याचे उद्योग केले अशांना सोबत घेऊन उद्धव ठाकरे लोकशाही वाचवायला निघाले आहेत, अशी खोचक टिप्पणीही त्यांनी केली. प्रबोधनकार ठाकरे आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतल्याखेरीज स्वकर्तृत्वाच्या बळावर ज्यांना पक्ष वाढविता येत नाही असे उद्धव ठाकरे आता लोकशाही वाचविण्याचा बहाणा करत असले तरी प्रत्यक्षात मात्र, मिळेल त्याला हाताशी धरून उरलासुरला पक्ष वाचविण्याची त्यांची केविलवाणी धडपड सुरू आहे, असे उपाध्ये म्हणाले. हिंसाचार करून गरीबांना वेठीस धरणाऱ्या आणि देशात अस्थिरता माजविणाऱ्या नक्षलवाद्यांचे उघड समर्थन करणाऱ्यांच्या साथीने ठाकरे लोकशाही वाचविणार की लोकशाही संकटात टाकणार असा सवालही उपाध्ये यांनी केला. वैचारिक विरोधावर विश्वास नसलेल्या व दहशत माजविण्याचाच इतिहास असलेल्या संभाजी ब्रिगेडसोबतही ठाकरे यांनी काही महिन्यांपूर्वी युती केली. हिंदुत्वाची अस्मिता असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांची निंदा करणाऱ्या काँग्रेसपुढे गुडघे टेकले आणि सत्तेसाठी राष्ट्रवादीचा लाळघोटेपणा करून स्वाभिमान खुंटीला टांगला, ते ठाकरे लोकशाही संकटात असल्याचा कांगावा करतात हे हास्यास्पद आहे. मुळात उद्धव ठाकरे यांनी स्वतःच लोकशाहीला तिलांजली दिली असून त्यांच्या हुकूमशाहीला कंटाळल्यामुळेच शिवसेनेत फूट पडली. मातोश्रीवर भेटीसाठी गेलेल्या कार्यकर्त्यांना अपमानित करणे, त्यांना साधी भेटही न देता ताटकळत ठेवणे आणि एकाधिकारशाहीने पक्ष चालविणे हेच शिवसेनेच्या ऱ्हासाचे कारण असल्याचे उघड झाले आहे. ज्यांना पक्षातही लोकशाही टिकविता आली नाही, बाळासाहेबांच्या पुण्याईमुळे भाजपची साथ घेऊन सत्तेपर्यंत पोहोचलेला पक्ष ज्यांनी आपल्या हुकूमशाही प्रवृत्तीमुळे संपविला आणि ज्यांनी खंजीर, कोथळा अशा हिंसक शब्दांनी लोकशाहीच्या सभ्यतेला काळीमा फासला ते उद्धव ठाकरे आता पक्ष संकटात सापडल्यामुळे लोकशाही वाचविण्याचा ढोंगीपणा करत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

# जिद्द व मेहनतीच्या जोरावर गाठले उत्तुंग यश

## वडोदचाथा येथील अप्पा कैलास चाथे यांची राज्य कर निरीक्षकपदी नियुक्ती


आधुनिक केसरी न्यूज

संदीप मानकर

सिल्लोड : तालुक्यातील वडोद चाथा येथील सर्वसाधारण व



शेतकरी कुटुंबातील अप्पा कैलास चाथे यांनी दैदिप्यमान भरारी घेत राज्य निरीक्षक (एसटीआय) या पदाची परीक्षा विशेष गुणांसह उत्तीर्ण केली. नुकताच राज्यात राज्यकर निरीक्षक परीक्षेचा निकाल लागला असून अप्पा चाथे यांनी या पदाच्या परीक्षेत महाराष्ट्रातुन 21 वा क्रमांक घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. अत्यंत सर्वसाधारण व वडिलोपार्जित शेतकरी कुटुंबातील अप्पा चाथे यांचे पहिली ते सातवीचे शिक्षण जि.प.शाळा वडोदचाथा येथे, आठवी ते दहावीचे शिक्षण अंबिका विद्यालय वडोदचाथा तर अकरावी, बारावी विज्ञान शाखा व पदवीचे शिक्षण यशवंतराव चव्हाण महाविद्यालय सिल्लोड येथून झाले. बालपणापासून हुशार असलेले अप्पा चाथे यांनी सुरुवातीपासूनच एमपीएससी परीक्षेची जय्यत तयारी करुन त्यांत यश मिळविले. शेतकरी कुटुंबातील त्यांचे वडील कैलास शेणफडू चाथे, आई सुभद्राबाई चाथे, मोठे बंधू ज्ञानेश्वर चाथे यांनी घरची परिस्थिती अतिशय हालाकीची असतांना देखील काबाडकष्ट करुन आपल्या मुलांना शिक्षणात कुठलीही कमी पडू दिली नाही मुलगा अप्पा चाथे राज्य कर निरीक्षक, मोठी मुलगी कांताबाई व यमुनाबाई या दोन्ही वगळता कल्पना पोलीस खात्यात हेड कॉन्स्टेबल तर छोटी मुलगी कविता ही देखील आज पोलीस खात्यात हेड कॉन्स्टेबल पदांवर नोकरी करीत आहे. तर आई-वडील आणि भाऊ हे सर्व लहानपणापासूनच आमच्यात शिक्षणाबद्दल जनजागृती करुन त्याचे महत्त्व समजावून सांगायचे म्हणून कुटुंबाच्या याच प्रेरणेमुळे तसेच गुरुजनांचे मोलाचे सहकार्य आणि पाठिंबा लाभल्यामुळेच मला हे यशोशिखर गाठता आले अशी प्रतिक्रिया अप्पा चाथे यांनी "दै. आधुनिक केसरी" सोबत बोलतांना व्यक्त केली. तर त्यांच्या या यशामुळे आणि कर्तबगार कामगिरीमुळे त्यांचे सर्वच स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## स्वामीकृपा

आधुनिक केसरी



अहमदनगर जिल्ह्यातील खेडगाव हे एक छोटंसं गाव. या गावात शेतकरी, शेतमजुरी करणारी बहुतेक कुटुंबे गुण्यागोविंदाने नांदत होती. अशा कुटुंबांपैकी एक होतं देशमुख कुटुंब. या कुटूंबात आईवडील, एक मुलगा, एक मुलगी आणि आजी आजोबा असे सहा जण. वडील साहेबराव तलाठी म्हणून काम करीत. आई गृहिणी होती. मोठी मुलगी रेश्मा आणि तिच्यापेक्षा लहान असलेला राहुल. नाही म्हणायला देशमुख कुटुंबीयांची थोडीशी शेती होती, पण त्यातून फारसे उत्पन्न हाती लागत नव्हते. पण अशा सामान्य परिस्थितीतही देशमुख कुटुंबीयांनी आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून खूप प्रयत्न केले होते. त्यांना शिक्षणासाठी पैसे कमी पडू नयेत म्हणून आई घरखर्चात काटकसर करून पैसे वाचवायची. वडीलही बाहेरची दोन कामे जास्त कामे करून दोन पैसे अधिक मिळावेत म्हणून धडपडत असत. देशमुख कुटुंबीयांची परिस्थिती सामान्य असली तरी संस्काराची श्रीमंती मोठी होती. आपल्या कष्टाच्या कमाईचाच पैसा घरात यावा यासाठी साहेबराव दक्ष असत. घरातले वातावरण धार्मिक होते. रेश्माच्या आईची स्वामी समर्थांवर अपार श्रद्धा होती. रेश्माच्या आईने रेश्माला अभ्यासासोबतच घरकाम आणि स्वयंपाकातही तयार केले होते. कधी कधी आई जर माहेरी गेली, तर रेश्मा तिची उणीव भासू द्यायची नाही. ती उत्तम स्वयंपाक करून सगळ्यांना जेवू घालायची. तिच्या हाताला कमालीची चव होती. रेश्मा आणि राहुल दोघं भावंडं अभ्यासात हुशार होती. त्यांचा शाळेत नेहमी पहिल्या पाचात नंबर असायचा. रेश्मा बारावी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाली. जवळच्याच कॉलेजात तिने बी ए साठी प्रवेश घेतला. रेश्मा मुळातच देखणी असल्याने तिला बारावीपासूनच स्थळे चालून येऊ लागली होती. बी ए च्या शेवटच्या वर्षाला असताना तिला नगरच्या पाटलांच्या मुलाचे, नितीनचे स्थळ आले. नितीन इंजिनिअर झालेला होता. दिसायला उत्तम होता. परंतु सध्याच्या कठीण काळात त्याला चांगली नोकरी मिळणे दुरापास्त झाले होते. मुंबईला एका कंपनीत कमी पगारावर त्याला काम मिळाले होते. पण सुरुवात तर करू या.

**क्रमशः**



## आनंदी पहाट

### प्रत्येक आर्थिक गुंतवणूक भावनिकतेतून नसावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दैनंदिन खर्चात मोठ्या रक्कमेच्या खर्चासाठी आपल्याला सतत पैसे लागत नाहीत मात्र छोट्या रक्कमेच्या वस्तूंची खरेदी मात्र वरचेवर आपल्याकडून सारखीच होत असते. आणि यातच आपल्याजवळील पैसे किती आणि कसे संपले याचा ताळमेळच काहीवेळा जमत नाही. त्यामुळे एकवेळ मोठ्या खर्चासाठी फार मागेपुढे पाहण्याची गरज नाही परंतु छोट्या खर्चांवर मात्र काटेकोरपणे लक्ष ठेवणं तसेच असे खर्च आपल्या मर्यादेत आणि नियंत्रणात ठेवणं केवळ आवश्यकच ठरतं असं नाही तर बचतीच्या दृष्टिकोनातून फायदेशीर ठरतं. आपल्या घरातल्या लहान मुलांना एक, दोन, पाच रुपयांची नाणी त्यांच्या घरेलू बँकेत ठेवण्यासाठी द्या. आपल्यापेक्षा हि लहान मुलेच बचतीचे काम नेटानं करतात. थेंबे-थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे एक एक रुपयांच्या बचतीतून त्यांच्याच भावी आयुष्यासाठी लाखो रुपयांची बचत होऊ शकते. अनेक प्रकारच्या बिलांची रक्कम आगाऊ भरल्यास अथवा इंटरनेटद्वारे भरल्यास मिळणारी सूट एकप्रकारे काही प्रमाणात आपली बचतच करत असते. प्रत्येक महिन्याची हि एकूण रक्कम अगदी शंभर रुपये असली तरीही वर्षभराची याद्वारे होणाऱ्या आपल्या बचतीची रक्कम एक हजार दोनशेहून अधिक असणार आहे. आपल्या पैशाच्या गुंतवणुकीला भावनांची जोड असते. आपल्या भाव-भावना, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण, चांगले-वाईट अनुभव या सर्वच गोष्टींचा संबंध आपल्या पैशाच्या गुंतवणुकीशी असतो. त्यामुळे आपण करत असलेली "गुंतवणूक भावनांची असते आणि आनंद कोट्यावधींचा असायला लागतो". या आनंदाची अनुभूती अनुभवण्यासाठी निश्चितच काही विशेष खबरदारी घ्यावी लागते. काहीवेळा आपल्या गुंतवणुकीचा विषय भावनेचा असल्यामुळे आपण निर्णय देखील भावनेच्या आहारी जाऊन घेतो.



आधुनिक केसरी

### भगवंता | पुण्यवंत ||

पुण्याचा महिमा | आम्हा काय ठावा ||
घेईन केशवा | नाम तुझे ||१||
नामाचा महिमा | हरिपाठ सांगे ||
पुण्य घरी रांगे | निशी दिनी ||२||
भाव कर्म करू | कर्म देव मानू ||
पुण्य वर्म जाणू | कर्मासंगे ||३||
देहास जडो ते | कर्माचे बंधन ||
आत्म्याचे मिलन | नामा संगे ||५||
कर्ता-करविता | तूच रे अनंता ||
जाणी भगवंता | पुण्यवंत ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरुपण"

आधुनिक केसरी


### जागी सदैव माता

खरे सांगतो तुम्हासी।
काही नाही दिले अंबेसी।
विचारे केली याचना।
माये भाकली करूणा।
असे लेकराच्या हिता।
जागी सदैव माता।
हासे गुरुवचनी निष्ठा।
लाभलेसे सर्वाभिष्टा।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

## || गुरुसेवा करणे म्हणजे काय ? ||



आधुनिक केसरी

साधनाची आटाआटी कुठपर्यंत करायची ? जप, तप, नेम, याग, वगैरे आपण कशाकरिता करतो ? तर देवाची प्राप्ति व्हावी म्हणून. तोच देव जर आपल्या घरी आला, तर साधनाची आटाआटी कशाला करायची ? म्हणून, साधनाची आटाआटी करण्याचे कारण नाही; नाहीतर त्याचाच अभिमान होतो, आणि मिळवावयाचे ते बाजूलाच राहून उलट तोटा होतो. जे जे घडत असते ते माझ्या इच्छेने झाले असे समजत जा आणि त्यात आनंद माना. तुम्ही जी जी गोष्ट कराल त्यात मला आठवा. गुरुभक्ति करायची म्हणजे काय ? त्याच्या देहाची सेवा करणे हीच गुरूची सेवा असे तुम्हाला वाटते का ? त्याच्या देहाची सेवा करणे ही गुरूची खरी सेवाच होत नसते. गुरू सांगेल तसे वागणे, हीच त्याची खरी सेवा होय. माझ्याजवळ जे येतात, ते कुणी मुलगा मागतो, कुणी संपत्ती मागतो, कुणी रोग बरा व्हावा म्हणून मागतो; तेव्हां माझी सेवा करायला तुम्ही येता, का मीच तुमची सेवा करावी म्हणून येता ? माझ्याजवळ येऊन, मनुष्यदेहाचे खरे सार्थक होईल असे करा. तुम्ही मागाल त्याप्रमाणे मी थोडेसे देणार नाही असे नाही; पण ते काढा घेण्याकरिता गुळाचा खडा देण्यासारखे आहे. 'मला सर्व कळते' असे माझ्याबद्दल तुम्ही म्हणता, पण ते मनापासून नव्हेच. कारण ज्याला असे खरोखर वाटत असेल त्याच्या हातून पापकर्म होणारच नाही. ज्याची वृत्ती माझ्याशी एकरूप होईल त्यालाच कळेल की, मला सर्व कळते आहे. गुरूला अनन्य शरण जाणे म्हणजे इतके की, त्याचे मन आणि आपले मन एकच झाले पाहिजे. म्हणजे दैववशात जरी आपण गुरूपासून दूर असलो तरी मनाने त्याच्याशी संलग्न असल्यावर त्याच्यापाशीच असू. आपण आपल्या आईशी जसे बोलतो तसे माझ्यापाशी बोलावे, आपले सर्व दुःख मला सांगत जावे. तुम्ही इतके कष्ट घेऊन मला भेटायला येता, पण तुम्हाला रिकामे परत जाताना पाहून मला फार वाईट वाटते. माझ्याजवळ जे आहे ते व्यावहारिक जगात कुठेही तुम्हांला मिळायचे नाही; ते म्हणजे भगवंताच्या नामाचे प्रेम होय. सगळ्या प्रपंचात खरी विश्रांती असेल तर ती नामस्मरणातच आहे. ज्याला मी भेटावा असे वाटते, जो माझा म्हणवितो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे.

**आजचे बोधवचन :** नामावर प्रेम करणे म्हणजेच माझ्यावर प्रेम करणे.

## मनाचे श्लोक



दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

आधुनिक केसरी

**भजाया जनी पाहतां राम येकू।**
**करी बाण येकु मुखीं शब्द येकु।**
**क्रिया पाहतां उध्दरे सर्व लोकु।**
**धरा जानकीनायकाचा विवेकू।।१३१।।**

**श्लोकार्थ :** एकबाणी एकवचनी रामाचे चरित्र सामान्य माणसाला अनुकरणीय आहे. रामाचे चरित्र सर्वोत्तम आहे. एकपत्नी व्रत धारण करणाऱ्या रामाचा आदर्श समोर ठेऊन तसे जगण्याचा मनुष्याने प्रयत्न करावा आणि आपला उद्धार करवून घ्यावा.

**विवेचन :** एक असते प्रवृत्ती, एक असते निवृत्ती आणि पूज्य बाबा बेलसरे सांगायचे ती असते निरवृत्ती. प्रवृत्ती आणि निवृत्तीच्या पलीकडील वृत्तीला निरवृत्ती म्हणता येईल. ही स्थिती येणे खूप महत्वाचे. निरवृत्ती होण्यासाठी एकांत अत्यावश्यक आहे असे समर्थांनी मागील श्लोकात सांगितले आहे. या श्लोकात एकांत विवेकाने कसा साध्य करायचा ते सांगत आहेत.

"आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथ आमुचा परमार्थ । जो समर्थाचाही समर्थ । देवां सोडविता ॥" (दा. ०६.०७. २१)

सामान्य माणसाला अनुकरणीय असे कोणते चरित्र असेल तर ते म्हणजे रामचरित्र. आपण रामचरित्र नीट समजून घेतले तर आपल्या लक्षात येईल की जो जो रामाला भेटला, शरण गेला, त्याला रामाने नुसते अभय दिले नाही तर त्यांचा उद्धारही केला. प्रभू श्रीरामाच्या संपर्कात जो जो आला, त्याचे, त्याच्या आयुष्याचे सोने झाले...! रामाने शबरीची उष्टी बोरे खाल्ली आणि तिला मुक्ती दिली, सुग्रीवाला राज्य दिले, हनुमंताला आपले नाम देऊन चिरंजीव केले, त्याने अहल्येचा उद्धार केला, विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण केले, विभिषणाचा राज्य देऊन गौरव केला, देवांना मुक्त केले, रावणाला मारले आणि त्यालाही मुक्ति दिली. "राम विश्राम देवांचा । राम भक्तांसी आश्रयो । राम योगी मुनी ध्यानीं । राम रक्षी रुसीकुळा ॥१॥ राम व्यातो चंद्रमौळी । राम राम सदा जपे । रामकथा ऐकतां हे । रामरूप निरंतरीं ॥२॥ पार्वती पुसतां सांगे । राम जप अत्यादरे । सुंदरें दोनी अक्षरें । निवालों अंतरीं सुखें ॥३॥ नाळिलें पोळिले वीषें । कर्कशे काळिमा चढे । उपाय बहुधा केले । रामनामेंचि सुटीका ॥४॥ सव्य अपसव्य या नामें । तरले सुटले बहु । अंतकाळीं सर्व काळिं । सुटीका सकळै जना ॥५॥ कीर्ति या रघुनाथाची । पाहातां तुळणा नसे । येकबाणी येकवचनी । येकपत्नी च धार्मिकु ॥६॥"**(संदर्भ :- समर्थ विरचित, मान पंचक)** प्रापंचिक मनुष्यासाठी राम हा आदर्शच. आज्ञाधारक मुलगा, आदर्श पती, विश्वासू मित्र, आपल्या सेवकाची काळजी घेणारा राम. ह्यातील एक आदर्श जरी आपण आपल्या डोळ्यासमोर ठेवला आणि तसे आचरण करण्याचा प्रयत्न केला तर आपल्या जीवनात नक्कीच 'राम' येईल आणि आपले जीवन आपल्या अपेक्षेपेक्षा अधिक सुखदायी होईल, यात तीळमात्र शंका नाही. प्रभू श्रीराम एक बाणी आहेत, एक वचनी आहेत तसेच त्यांनी एक पत्नी व्रत पाळलेले आहे. सामान्य मनुष्याने किमान वरील तीन गुण आचरण्याचा प्रयत्न केला तरी त्याचे जीवन सुखावह होऊ शकेल. राम इथल्या चराचरात इतका भरून राहिला आहे की आपण आनंद झाला तरी 'राम' आहे असे म्हणतो आणि शोक झाला तर 'राम' नाही असे म्हणतो , पण राम म्हणावेच लागते...! रामाने आपल्या जीवनात कोणतीही गोष्ट आततायीपणाने केली नाही. प्रत्येक गोष्ट त्याने विवेकाने केली आहे. सितामातेला पळवल्या नंतर रामाने अयोध्येला निरोप पाठवून सैन्य मागवून घेतले नाही की स्वतः विलाप करीत स्वस्थ बसला नाही. प्राप्त परिस्थितीचा अभ्यास करून त्यातून त्याने मार्ग काढला. वानरांची सेना संगठीत करून अचूक प्रयत्नाने त्याने रावणावर विजय मिळविला. सामान्य मनुष्याने देखील असेच करावे, किंबहुना असे करणे समर्थांना अपेक्षित आहे. शिवकाळात तसेच घडले. अचूक प्रयत्न आणि विवेकाने कृती केल्यास यश मिळण्याची शक्यता जास्त असते. समर्थ म्हणतात, "अचुक येत्न करवेना । म्हणौन केलें तें सजेना । आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्यां ॥" (दा. १२.०२.०६)

# हजारो आदिवासी महिलांचा 'उलगुलान'

## आदिवासींच्या हितासाठी केलेली कायद्याची अंमलबजावणी केंद्र सरकार करत नाही : राहुल गांधी

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** भारत जोडो यात्रे चा काल २० तारखेला शेटचा टप्पा पार पडला.यात्रेला अर्थात संविधानला समर्थन तर वाढती महागाई, देशात स्वातंत्र्य, बंधुता, लोकशाही धोक्यात आली म्हणुन व आदिवासी करिता असलेली कायद्याची अंमलबजावणी होत नसल्याने त्या कायद्यांना निरभ्र करित आदिवासीच हित सुद्धा होत नाही. हा समज आदिवासी झाला आहे, म्हणून प्रचंड रोष आदिवासी महिला मधे सुद्धा निर्माण झाला आहे. लोक संघर्ष मोर्चा च्या नेता प्रतीमा शिंदे याचे नेत्रूत्वात हजारो तळवी, पाडवी, भिल्ल, भिलाला, पावरा, कोकणी, बारेला, कोरकू आदिवासी महिला या परिषदेत आल्या होत्या त्यांना संबोधित करतांना राहुल गांधी म्हणाले की, आम्ही सत्तेत असताना आदिवासी हितासाठी केलेले कायदे वनजमीनअधिनीयम, पेसा,अधीनीयम व ऐकूनच सर्व कायद्याची अंमलबजावणी केंद्र सरकार करित नाही.तर उलट ती कायदे कमजोर करण्याच काम हे सरकार करित आहे. आम्ही ते होऊ देणार नाही व सत्तेवर आल्यास त्याची प्रभावी अंमलबजावणी करु अशा प्रकारे त्यांनी आदिवासी महिला परिषदेला संबोधित करतांना सांगितले. त्याचबरोबर महीला वरील अत्याचारा संबंधि बोलताना ते म्हणाले की, भाजपा,संघ या लोकांची समज फार खालची आहे. कारण कुठे बलात्कार झाला तर ही लोकं म्हणतात त्या वेळी ती महीला रात्री तेथे का होती? तिने कपडे छोटे का घातली होती? अस म्हणत बलात्कार महिला गुन्हेगारांना ठरवतात, तर आमच मत आहे बलात्कार करणारा गुन्हेगार असतो हा फरक आमच्या आणि त्यांच्या मध्ये आहे.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, देशाची आर्थिक परिस्थिती बिकट असून अदानी, अंबानी यांच खर राज्य आपल्या वर आल तर धर्मा धर्मात, जाती जातीत द्वेष निर्माण करण्याच पाप हे सरकार करित आहे. संविधान, लोकशाही धोक्यात आली आहे त्या करिता ही यात्रा आहे आपल्याला हा देश जोडायचा आहे. लोक संघर्ष मोर्चा च्या प्रतिभा शिंदे यांनी आम्ही आदिवासी महिला भक्कमपणे राहुल गांधी तुमचे पाठीशी आहोत तर वेळप्रसंगी जलात सुद्धा जाण्यासाठी तयार आहे त्यानी बुलढाणा जिल्ह्यातील वनजममीन पट्टे, जातीची दाखले प्रश्न निर्माण होऊन व आदिवासी विकास होत नसल्याच निदर्शनास आले आहे असी गंभीर बाब परिषद



समोर मांडत हा आपला आहे कन्याकुमारी पासुन काश्मीर पर्यंत आपण जाऊ शकतो हा विश्वास देशात प्रत्येकक्ष हजारो किलोमीटर पायी चालून राहुल गांधी निर्माण करित आहे तर धर्म, जाती, वंश, प्रांत, भाषा भेद आपल्याला तोडू शकणार हा विश्वास या यात्रेनी दिला व आदिवासीचे पाठीशी तुम्ही रहा आम्ही तुमच्या सोबत आहोत असा विश्वास दिला. आदिवासी हे वनवासी एवढेच सिमीत नसुन खर तर ते या देशाचे मालक आहे. राहुल गांधी यांनी महीला आदिवासी परिषद समजावत तुम्ही फक्त वनवासी नाही आदिवासी आहात हे समजवताना तुम्ही जर वनवासी असाल तर फक्त तुम्ही वनातच राहा शहरात येऊन डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक बनू नका ते आम्ही होनार हा उद्देश तुम्हाला वनवासी म्हणार्यांचा आहे. तुम्हाला वनवासी म्हणत संविधानात असणारे तुमचे हक्क तुम्ही आदिवासी आहात म्हणून आबाधित आहे. वनवासी झालात तर ते अबाधित राहणार नाही. असे म्हणत मग बोला तुम्ही कोण? अस म्हणत साद घालताच हजारो महिला म्हणाल्या आम्ही आदिवासी, आदिवासी आणि त्यांच नात सांगताना ते म्हणाले माझी आजी इंदिरा गांधींन जवळ ऐक पुस्तक होत ज्यामध्ये आदिवासी मुलाच चित्र होतं ते वाचायचा मी हट्ट धरायचो , मी लहान होतो मला समजत नव्हते मी विसरलो सुद्धा होतो. पण मुझीयममधे मी ते पुस्तक पाहिल व वाचल तेव्हा अस लक्षात आले हा देश समजून घेण्या करिता आदिवासी संस्कृती ला समजून घेतले तर हा देश समजुन धेता येईल!

# कोल्हापूर येथील हरवलेला अनिल चव्हाण पालकांच्या स्वाधीन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कोल्हापूर येथून हरविलेला 30 वर्षीय युवकाला रविवारी दि 20/11/2022 ला केशवस्मृती प्रतिष्ठान संचलित समतोल प्रकल्प व बेघर निवारा केंद्र यांच्या प्रयत्नांनी त्या युवकाला पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. त्यामुळे पालकांचा आनंद गगनात भावेनासा झाला आहे. दि 19/11/2022 शनिवारी हा युवक जळगाव रेल्वे स्थानकावर समतोल प्रकल्पाचे समनव्यक प्रदिप पाटील व आरपीएफचे जवान सी. जे. चौधरी यांना हा युवक एकटा भटकताना दिसून आला. त्या युवकाला चारपूस करण्यासाठी प्रदिप पाटील यांनी रेल्वेस्थानक येथील समतोल प्रकल्पाच्या ऑफिसला आणले. त्या युवकाकडून दिलेल्या नंबर वरती संपर्क केला असता तो नंबर युवकांच्या भावाला लागला त्यामुळे लगेच ओळख पटली. त्यामुळे घरात परिवारात आई, वडील, भाऊ व पत्नी यांचा आनंद गगनात भावेनासा झाला. दिलेल्या फोन नंबर वर संपर्क साधून या युवका विषयी माहिती देण्यात आली. हा युवक त्यांचाच मोठा भाऊ निघाला हा युवक गोकुळशिरी एमआयडीसी कोल्हापूर येथून 14 /11/2022 पासून मिसिंग झालेला होता, अधिक माहिती युवकाला विचारले असता मी कसा आला. कोणी आणले मला काही ही माहिती नाही, असे युवकाचे म्हणणे आहे. युवकाची कोल्हापूर गोकुळशिरी एमआयडीसी पोलीस स्टेशनला मिसिंग ही दाखल होती. युवकाला काळजी व सुरक्षेसाठी निवाऱ्यासाठी बेघर निवारा केंद्र येथे दाखल करण्यात आले होते. आज दि 20/11/2022 रविवारी युवकाचा परिवार युवकाला घेण्यास आले. त्यावेळी त्या युवकाला पाहून परिवाराच्या सदस्यांनी खूप आनंद व्यक्त केला. त्यांनी संस्थेचे व संस्था कर्मचारी यांचे आभार मानले व संस्थेच्या, कर्मचाऱ्यांच्या पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. यांनी बजावली विशेष कामगिरी समतोल प्रकल्पाचे व्यवस्थापक भानुदास येवलेकर, समनव्यक प्रदिप पाटील, तांत्रिक तज्ञ व्यवस्थापक म.न.पा. गायत्रीताई पाटील, संत गाडगेबाबा शहरी बेघर निवारा केंद्राचे अध्यक्ष गणेश पाटील, विश्वजित सपकाळे, भारती मरसाळे, जवान सी. जे. चौधरी व मनोज कुलकर्णी, काळजी वाहक राजेंद्र मराठे, हर्षल वंजारी, शितल काटे यांच्या प्रयत्नाने हरविलेल्या युवकाला आई, वडील, भाऊ, पत्नी व मुलांचे वात्सल्य पुन्हा मिळवून देण्यात मौलाचा वाटा उचलला.



# धुळ्यात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राज्यपालांविरोधात आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** छत्रपती शिवरायांच्या बद्दल एका जाहीर कार्यक्रमात राज्यपालांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. राज्यपालांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्य संपूर्ण महाराष्ट्रात पडसाद उमटत असून धुळ्यात देखील राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने राज्यपालांच्या धोतर व टोपीमध्ये सडके कांदे टाकत प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले आहे. तसेच राज्यपालांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली. राज्यपालांना पदा वरून त्वरित हटवून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी यांनी केली आहे. सदरचे आंदोलन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख यांच्या सूचनेनुसार कार्याध्यक्ष वाल्मीक मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळ्यात करण्यात आले. याप्रसंगी निखिल मोमाया, एजाज शहा यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहीद मनोज गायकवाड यांना भावपूर्ण निरोप



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जम्मू काश्मीरमध्ये हिमस्कलनात शहीद झालेले जवान मनोज गायकवाड यांच्यावर धुळे जिल्ह्यातील चिंचखेडा येथे शासकीय इतामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पंचक्रोशीतील हजारो नागरिक त्यांच्या अंत्ययात्रेत सहभागी झाले होते. गावात प्रत्येक अंगणासमोर रांगोळी काढून आणि पुष्पवष्टी करून गायकवाड यांना शेवटचा निरोप देण्यात आला. भारत माता की जय... शहीद जवान मनोज गायकवाड अमर रहे... या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. यावेळी खा. सुभाष भामरे, आ. कुणाल पाटील, जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्यासह लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते. गायकवाड यांनी तब्बल 21 वर्ष देशाची सेवा केली. निवृत्तीचे शेवटचे दोन वर्ष उरले असताना त्यांना वीरमरण प्राप्त झाले.

# साहित्य प्रवाह दिवाळी विशेषांक दीपोत्सव 2022 चे विमोचन

आधुनिक केसरी न्यूज



**अमरावती :** साहित्य, संस्कृती आणि बोलीभाषेसाठी वाहिलेल्या 'साहित्य प्रवाह' या त्रैमासिकाचे वतीने काढण्यात येत असलेल्या दीपोत्सव या दिवाळी विशेषांक 2022 चे विमोचन शनिवार दि.19 नोव्हेंबर 2022 रोजी दुपारी 5 वाजता जेष्ठ साहित्यिका प्रा. डॉ.शोभाताई रोकडे व प्रमुख मान्यवर साहित्यिक बंधूंच्या हस्ते संपन्न झाले. सुप्रसिद्ध साहित्यिक विशालजी कन्हेरकर यांनी संपादित केलेले त्रैमासिक 'साहित्य प्रवाह' हे साहित्य, संस्कृती आणि बोलीभाषेसाठी वाहिलेले एकमेव त्रैमासिक असून जेष्ठ आणि नवोदित साहित्यिकांचे हक्काचे व्यासपीठ आहे. या मासिकाच्या वतीने काढण्यात आलेला हा दुसरा दिवाळी विशेषांक असून अतिशय सुंदर,सुबक व वाचनीय अश्या या दिवाळी विशेषांकाचे विमोचन जेष्ठ साहित्यिका प्रा. डॉ.शोभाताई रोकडे यांचे हस्ते अमरावती येथे पार पडले. यावेळी बोलताना शोभाताई यांनी साहित्य संवर्धनाच्या कार्यात साहित्य प्रवाह नक्कीचं यशाची नवी उंची गाठेल हा आशावाद व्यक्त करीत या अंकाला भरभरून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला साहित्य प्रवाह त्रैमासिकाचे संपादक विशाल कन्हेरकर,सातपुडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष व वऱ्हाडी कवी गजानन काकडे,संवेदना बहुद्देशीय संस्थेचे सचिव सुयोग राजनेकर,प्रतिभावंत कथालेखक विशाल मोहोड,कवी अजय अडीकने प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. छोटेखानीरित्या संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन साहित्य प्रवाहचे संपादक विशाल कन्हेरकर यांनी यशस्वीपणे केले.



# गुरुकुल ओलिम्पियाड स्कूलमधील ७ मुलींची 16 वर्ष खालील औरंगाबाद विभाग संघात निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** गुरुकुल ओलिम्पियाड स्कूलमधील 7 मुलींची औरंगाबाद विभाग संघ मध्ये निवड झाली असून हा संघ महाराष्ट्र राज्य स्तरीय सपर्धे मध्ये सहभागी होणार आहे. भद्रावती चंद्रापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत हा संघ सहभागी होईल खेळाडूंच्या निवडी बद्दल प्राचार्य सतीश तांबट सर मेंटोर गणेश साळुंके सर मुख्यधपक कविता मॅडम पूजा मॅडम क्रीडा विभाग अविनाश कोलेश्वर व व्हॉलीबॉल प्रशिक्षक अभिषेक गणोरकर यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. निवड झालेल्या खेळाडूंची नावे अवनी देशपांडे, अंविक्षा राजपूत, स्वामिनी कुलकर्णी, नंदिनी गांगापूरकर, अदिती देशमुख, जानवी पवारे, निमकर.



## टाटा है तो मुमकिन है

आधुनिक केसरी

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील म्हणजेच आयटी सेक्टरमधील अनेक नामांकित कंपन्यांनी नोकरीवरुन काढून टाकलेल्या कर्मचाऱ्यांच्या मदतीसाठी रतन टाटा यांच्या अध्यक्षतेखालील टाटा समूह पुढे सरसावला आहे. टाटा ग्रुपच्या मालकीच्या जाग्वार लॅण्ड रोव्हर (जेएलआर) या १०० वर्षांहून जुन्या वाहननिर्मिती क्षेत्रातील ब्रिटीश कंपनीने कर्मचाऱ्यांना नोकरीवर घेण्यासाठी तयारी दर्शवली आहे. इलेक्ट्रॉनिक कार निर्मितीसंदर्भातील कामांसाठी जाग्वार लॅण्ड रोव्हर या कर्मचाऱ्यांना नोकरीची ऑफर देणार असल्याचे वृत्त रॅायटर्स या वृत्तसंस्थेने दिले आहे. भारतातील टाटा मोटर्सच्या मालकीच्या जेएलआर कंपनीने शुक्रवारी त्यांच्या नोकरीसंदर्भातील पोर्टलवर ८०० नोकऱ्यांसंदर्भातील माहिती अपडेट केली आहे. स्वयंचलित म्हणजेच सेल्फ ड्राइव्ह कार, वाहनांचे इलेक्ट्रीफिकेशन, मशीन लर्निंगसारख्या क्षेत्रांमध्ये नोकरभरती करायची असल्याचे कंपनीने म्हटले आहे. तसेच डेटा सायन्स म्हणजेच तांत्रिक माहिती गोळा करण्यासंदर्भातील नोकऱ्याही उपलब्ध असल्याचं 'जेएलआर'ने म्हटले आहे. आपल्या आलिशान गाड्यांसाठी जगभरामध्ये ओळख असलेल्या 'जेएलआर'ने प्रथम प्राधान्य इलेक्ट्रॉनिक्स कारला या धोरण राबवण्याचे निश्चित केले आहे. २०२५ पर्यंत 'इलेक्ट्रीक-फर्स्ट' हे उद्दीष्ट साध्य करण्याचा कंपनीचा मानस आहे. 'ॲमेझॉन'सारख्या मोठ्या कंपन्यांमधून कर्मचारी कपातीअंतर्गत काढून टाकलेल्या कर्मचाऱ्यांकडे कंपनीला लागणार कौशल्य असल्याचे 'जेएलआर'चे म्हणणे आहे. ब्रिटन, आर्यलॅण्ड, अमेरिका, भारत, चीन आणि हंगेरीसारख्या देशांमध्ये काम करण्याची संधी या कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध आहे असे कंपनीचे म्हणणे आहे. म्हणजे योग्य उमेदवारास थेट परदेशातही नोकरी लागू शकते अशा ऑफर्स सध्या टाटांची मालकी असलेल्या 'जेएलआर'कडे आहेत. नव्याने जारी केलेल्या यादीमधील अनेक नोकऱ्या या ब्रिटनमधील आहे. या नोकऱ्यांची संध्या कंपनीच्या मँचेस्टर आणि गेडॉन या दोन कार्यालयांमध्ये उपलब्ध असल्याची माहिती कंपनीचे प्रमुख माहिती अधिकारी अँथनी बीटेल यांनी दिली. बऱ्याच काळापासून तिथे व्हेकन्सी उपलब्ध आहेत. काही कौशल्य असणारी माणसे त्या जागी भारणे हे फार आव्हानात्मक आहे कारण सध्याची बाजरपेठ फारच स्पर्धात्मक झालेली आहे. खास करुन सॉफ्टव्हेअर आणि आर्किटेक्ट क्षेत्रामधील कुशल नोकरदार तात्काळ मिळत नाहीत, असे बीटेल यांनी ऑनलाइन माध्यमातून दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे.

## ज्ञानदेव वैष्णव मोठा...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**महाराष्ट्राच्या इतिहासातील अलौकिक, अतुलनीय, महान भक्तीपरंपरा म्हणजेच आळंदी-पंढरपूर वारी! एकदाच घरून निघायला लावून त्याच निश्चित तारखेला इप्सित स्थळी पोहचायला लावणाऱ्या भारतातीलच नव्हे तर जगातील अशा दोनच वाऱ्या म्हणजे पांडुरंगाची पंढरपूर-आषाढी वारी आणि दुसरी म्हणजे संतश्रेष्ठ ज्ञानोबारायांची आळंदी-कार्तिक वारी! इथे "आषाढी-कार्तिकी विसरू नका मज । सांगतसे गुज पंढरीराव॥"असे आवाहन प्रत्यक्ष देवच आपल्या भाबड्या भक्तांना करतो. यातील एक वारी देवाची तर दुसरी संताची, म्हणजे वारकरी सांप्रदाय हा "देव ते संत देव ते संत। निमित्य त्या प्रतिमा॥" हा विवेकवादी विचार घेऊन चालतोय.**

एका वारीत संत देवाकडे जातात तर दुसऱ्या वारीत प्रत्यक्ष देवच संतांकडे देहू-आळंदीला येतो! कार्तिक वद्य (उत्पत्ती) एकादशी पासून ते कार्तिक वद्य त्रयोदशी पर्यंत चालणारा महावैष्णव संत ज्ञानोबाराय संजीवन समाधी सोहळा! एक सुख-दुःखाचा अनुभूतीपूर्ण सोहळा! आज महाराष्ट्रातील वारकरी आळंदीत आलाय तो संत ज्ञानेशांचा ज्ञान-भक्ती-वैराग्य वारसा घेऊन जाण्यासाठीच!

वाङ्मय आणि योग-ज्ञान-भक्ती-वैराग्य क्षेत्रातील माउलींचे योगदान हे अनन्यसाधारणच! तत्कालीन समाज आणि धर्मव्यवस्था ही कट्टरता, वर्णव्यवस्था, थोतांड, कर्मकांड, सनातन-पाखंडी विचारांनी पुरती पोखरली होती. धर्मश्रेष्ठतेसमोर माणूस कवडीमोल होता. याचे परिणाम ज्ञानेशादी भावडांना भोगावे लागले. श्री विठ्ठलपंत-सौ. रुक्मिणी दांपत्याला देहांत प्रायश्चित घ्यावे लागले. चारही भावंडांना बालपणीच प्रौढत्व आलं. भिक्षाटन करणाऱ्या ज्ञानदेवांना अपमानीत करून दारातून हाकलले, झोळीतील पीठ सांडून दिले. यामुळे व्यथित होऊन ज्ञानदेवांनी स्वतःला घरात कोंडून घेतले, तेंव्हा चिमुकल्या मुक्ताईने 'ताटीचे अभंग' लिहून व्यथित झालेल्या दादास उपदेश करून बोलते केले! अशा एक ना अनेक जीवघेण्या अनुभवांना सामोरे जात ही भावंडं खंबीरपणे उभी राहिली. ज्ञानदेवांनी अत्यंत कमी वयात इतिहासामध्ये सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे महान वाङ्मयीन व सांप्रदायिक योगदानामुळे त्यांना संत पंचकांमध्ये आद्य स्थान आहे. माऊलींची दृष्टांत आणि सिद्धांतपूर्ण वाङ्मयीन निर्मिती कालातीत आणि येणाऱ्या पिढ्यांना नित्य मार्गदर्शक आहे.



संत ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी आणि हरिपाठ हे चार अनमोल ग्रंथ आणि काही अभंग लिहिले. यापैकी ज्ञानेश्वरीची "नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी" अशा प्रकारे ज्ञानेश्वरी ग्रंथाची महत्ता अन्य संतांनी विषद केली आहे. या एकमेवाद्वितीय, अलौकिक ग्रंथाची आत्तापर्यंत लाखो पारायणे होऊन करोडो लोकांचे जीवन प्रकाशमय झाले. याचबरोबर अमृतानुभव ग्रंथ लिहून त्यातील अत्यंत गूढ असे मायावाद, शून्यवाद आदि तत्वज्ञानात्मक विषयांचे विवेचन करून आपली अध्यात्मविद्येतील बैठक किती उच्च कोटीची आहे हे सिद्ध केले. त्यानंतर ही चार भावंडं आपेगाव वरून आळंदी क्षेत्री जातांना वाटेत महायोगी, तपस्वी चांगदेव महाराजांना उपदेश म्हणून ६५ ओव्यांचा चांगदेव पासष्टी ग्रंथ लिहिला.

माऊलींचा शेवटचा ग्रंथ म्हणजे हरिपाठ. हा ग्रंथ म्हणजे जनमानसांना सहज, सोप्या रीतीने भक्ती करता यावी, कैवल्य प्राप्त व्हावे यासाठी आहे. केवळ २८ अभंग असलेल्या या सुंदर ग्रंथात अद्वैत तत्वज्ञान, भक्ती, समाधी आणि उन्मनी अवस्था, आत्मैकत्व आणि सगुण-निर्गुण, ध्यान इत्यादी विषय माउलींनी सहजतेने सांगितले आहेत. तद्वतच त्यांच्या अभंगातील विचार उपमा, उपमेय आणि दृष्टांत सहाय्याने जनमानसाच्या मनावर अधिराज्य गाजवते आहे. 'रूप पाहता लोचनी', 'घनु वाजे घूण घुणा', 'विश्वाचे आर्त' 'पंढरपुरीचा नीळा' 'कान्होबा तुझी घोंगडी', 'पैल तो गे काऊ कोकताहे' 'अवचिता परिमळू' हे अभंग भाव, भक्ती, प्रेम, तत्वज्ञान आदि संकल्पांनी ओतप्रोत भरून समाजमनातून अखंड प्रवाही आहेत.

कैवल्याचा पुतळा, ज्ञानियांचा राजा, पांडुरंगाचा निकटवर्ती, ज्ञानी भक्त, महायोगी, महावैष्णव, अलंदीप संतश्रेष्ठ कैवल्यसाम्राज्य चक्रवर्ती ज्ञानोबाराय योगशक्तींने लौकिक जीवनकार्य संपवण्याचा निरोप श्री विठ्ठलाला देतात आणि एका वारीचा मान देवाला तर दुसऱ्या वारीचा त्यांना द्यावा असा हट्ट देवापुढे करतात. ज्ञानेशाची ही मागणी मान्य होते आणि ठरल्याप्रमाणे आज म्हणजे कार्तिक वद्य त्रयोदशीच्या दिवशी संतश्रेष्ठ ज्ञानदेवराय आपले बहिण, भाऊ, सर्व संत आणि श्री रुक्मिणी-पांडुरंगाच्या साक्षीने आळंदीला सिद्धबेटावर समाधिस्थ होतात. हे सर्व संत नामदेवांनी समाधी अभंगात प्रेमार्तभाव चितारतांना "देव निवृत्ति यांनी धरिले दोन्हीकिर । जातो ज्ञानेश्वसर बैसावया॥"आणि "नामा म्ह णे आतां लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्व्र समाधिस्थन॥"असे लिहून भावविभोर होतात. सर्वांचीच 'बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा, तृण रानोमाळा पांगलेसे' अवस्था होते. एकमेकांच्या गळ्याला पडून सर्वच हंबरडा फोडतात. असा हा अलौकिक, ज्ञानसूर्य, युगपुरुष समाधिस्थि झाले!

आज महाराष्ट्रातील समस्त वारकरी ज्ञानेशांचा सप्तशतकोत्तर समाधी उत्सव साजरा करण्यासाठी आळंदीत जमले आहेत. सिद्धबेटावर भजन-कीर्तनातून माऊलींचा जयघोष होत आहे! सव्वासातशे वर्षानंतर या महावैष्णव संत ज्ञानेशांचा संजीवन समाधी सोहळा साजरा करतांना वारकरी सांप्रदायासमोर अनेक आव्हानं आ वासून उभी आहेत. विद्यमान काळात भजन-कीर्तन हे सर्वच माध्यमांवर आपली छाप सोडत आहेत. टी.व्ही., मोबाईलवर जेष्ठ-श्रेष्ठ, गुणी-ज्ञानी कीर्तनकारांची अभ्यासपूर्ण कीर्तनं एका क्लिकवर उपलब्ध आहेत, परंतु त्याची परिणामकारकता किती? प्रबोधन चालू आहे आणि भोवतालचे भयानक वास्तव समोर येत आहे. दिवसेंदिवस तरूण व्यसनांच्या आहारी जात आहे, गुटखा, ड्रग्ज, गांजा, अवैध दारूचे ट्रकच्या ट्रक पकडले जात आहेत, दिवसा ढवळ्या माय-बापाचा लेकाकडून खून होत आहे, नात्यानात्यातील दरी प्रचंड वाढली आहे. सर्वत्र नैराश्य, नकारात्मकतेने थैमान घातले आहे. वृद्धाश्रम वाढतच आहेत. नेमकं दुखणं कुठं आहे(?) ते सापडायला तयार नाही. प्रबोधनाचे प्रमाण वाढून सुद्धा परिणामकारकता का घटली? नव्या जगात खा.ऊ.जा. धोरणाने सारेच झपाटले आहेत. प्रचंड अर्थकेंद्री, अति आत्मकेंद्री जगण्याने सर्वच क्षेत्रांना पोखरून टाकलं आहे. ही येणाऱ्या पिढ्यांसाठी धोक्याची घंटा तर नाही ना(?) अशी अनामिक भीती वाटते, पण पुन्हा संत वचनं, त्याचं त्यागमय जगणं आणि जागवणं काळजाला गारवा प्रदान करून जगण्याला उभारी देतात!

चला तर मग, आपणही प्रांजळ मनाने थोडी निकी-निथळ जागृत-सेवा करूयात! गावपातळीपासून ते केंद्रसरकार पर्यंतचा एक लोकप्रतीनिधी यांना भेटून नम्र आवाहन करूयात कि; संतांनी, प्रबोधनकारांनी, विचारवंतांनी, शूरवीरांनी लोकरक्षणार्थ, जनउत्थान, जनकल्याण तत्वांचे रक्षण करण्यासाठी आपले अनमोल जीवन खर्ची घातले ते वाया जाता कामा नये. तसेच वर्तमानात कीर्तनकारांनी पैशांच्या हव्यासापोटी भ्रष्ट, पैसेवाल्यांच्या इशाऱ्यावर नाचू नये. बाष्कळ विनोद करून लोकरंजन करण्यापेक्षा संतांचे सडेतोड बोल सांगून समाजाच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालून कृतीशील कथन-वर्तन करणे ही आपली जबाबदारी आहे. निव्वळ व्यवसाय म्हणून कीर्तन न करता ते एक महान भक्ती-ज्ञान-प्रबोधनाचे साधन असून पैसे कमावण्याचे माध्यम नाही हे लक्षात ठेवावे! संतांसारखं वाङ्मय लिहिता येतं का(?) तेही पहावे आणि शेवटी, 'किर्तन चांग, किर्तन चांग। होय अंग हरीरूप' ही अनुभूती स्वअंतरी जागवून निर्मळ, निका, शुद्ध, निर्वैर परमार्थ करावा. शेकडो वर्षांची ही महान प्रबोधन, प्रेम-भक्तीची परंपरा, ज्ञानज्योत अखंड तेवत ठेवावी हीच माउलींच्या समाधीदिनी माफक अपेक्षा!

## भारत-तैवान मैत्री पर्वास सुरुवात



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५


आधुनिक केसरी

**तैवान आशिया खंडातील एक छोटासा देश. चीन आणि तैवान या दोन्ही शेजारी देशात विस्तव जात नाही कारण चीनच्या मते तैवान हा चीनचाच भूभाग असून तैवान हे स्वतंत्र राष्ट्र नाही. याउलट तैवान मात्र चीनचा हा दावा खोदून काढत आम्ही चीनचे गुलाम नसून आमचे राष्ट्र स्वतंत्र असून आमचे सार्वभौमत्व आम्ही जपणार आहोत. चीनने आमच्यावर अधिकार सांगू नये अशी ठाम भूमिका घेतली आहे यावरून चीन आणि तैवानमध्ये कायम संघर्ष सुरू असतो. चीन जरी तैवानचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करायला तयार नसली तरी जगातील अनेक देशांनी तैवानला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा दिला आहे त्यासाठीच मध्यंतरी अनेरिकेन सिनेटच्या अध्यक्षा नॅन्सी पॉलिसी या तैवानमध्ये आल्या होत्या.**

नॅन्सी पॉलिसी यांच्या तैवान दौऱ्यानंतर चीन चांगलाच खवळला होता व त्याने तैवान सीमेवर सैन्याची जमवाजमव करून तैवानला इशारा दिला होता मात्र चीनच्या या इशाऱ्याला छोट्याश्या तैवानने भीक घातली नाही उलट शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या म्हणीप्रमाणे तैवानने चीनच्या शत्रूंशी संधान बांधायला सुरवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून तैवानचे उपवित्तमंत्री चेन चर्ण यांनी नुकताच भारताचा दौरा केला. या दौऱ्याविषयी प्रसार माध्यमात जास्त चर्चा झाली नाही मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर हा दौरा विशेष चर्चेचा ठरला. सध्याचे जग हे दोन गटात विभागले गेले आहेत. चीन, रशिया, उत्तर कोरिया, इराण यासारखी आक्रमक राष्ट्रे एका बाजूला तर अमेरिका, इंग्लंड, इस्त्राईल आणि नाटो राष्ट्रे दुसऱ्या बाजूला. अर्थात भारताने अजूनही कोणाची बाजू घेत थेट कोणत्याच गटात सामील झाला नसला तरी भारताची भुमीका या सर्व घडामोडीत महत्वाची ठरणार आहे. भारताला नुकतेच जी २० गटाचे अध्यक्षपदही मिळाले आहे त्यामुळे भारताच्या भूमिकेकडे जगाचे लक्ष लागले



आहे कदाचित त्यामुळेच तैवानच्या उपवित्त मंत्र्याच्या भारत दौऱ्यावर जगात चर्चा होत आहे. तैवानच्या उपवित्त मंत्र्यांच्या भारत दौऱ्यानंतर चीनचा नेहमीप्रमाणे तिळपापड झाला हे वेगळे सांगायला नको. या दौऱ्यानंतर चीनने भारतासह तैवानवर



आगपाखड केली अर्थात चीनच्या आगपाखडीला भारत आणि तैवानने भीक घातली नाही. या दौऱ्यात भारत आणि तैवान दरम्यान ३० एमओयु वर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दोन्ही देशात अनेक महत्वाचे करार झाले आहेत. सध्या भारत हा तैवानच्या कंपन्यात गुंतवणूक करण्यास प्राधान्य देत आहे.

मागील काही दिवसात फॉक्सकॉन या तैवानच्या मोठ्या कंपनीने वेदांता सोबत गुजरातमध्ये देशातील पहिला सेमी कंडक्टर सुरू करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल टाकले आहे. आणखी एक तैवान कंपनी पेगाट्रेनने सुद्धा तामिळनाडूमध्ये एपलच्या उत्पादनाशी संबंधित प्रकल्प सुरू केला आहे. एकूणच भारत आणि तैवान मैत्री पर्वास आता सुरवात झाली आहे अर्थात ती काळाची गरजही आहे कारण दोघांचा समान शत्रू एकच आहे तो म्हणजे चीन. चीन सध्या जागतिक महासत्ता आहे. चीनशी एकट्याने मुकाबला करणे कोणत्याही देशाला शक्य नाही त्यामुळेच चीन अन्य देशांवर दादागिरी करीत आहे. चीनची ही दादागिरी मोडून काढायची असेल तर सर्व राष्ट्रांना एकत्र यावेच लागेल. कदाचित त्यासाठीच अमेरिकेच्या नॅन्सी पॉलिसी यांनी तैवानला भेट दिली होती. आता तैवानच्या उपवित्त मंत्र्याच्या भारत दौरा हे त्याचेच पुढचे पाऊल असू शकते. चीनच्या आक्रमकतेला तैवान आणि भारत एकत्र आल्यास आव्हान मिळू शकते म्हणूनच हा दौरा आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्वाचा मानला जात आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वागण्या-बोलण्याला अदबशीर झळाळी !

आधुनिक केसरी

**हिराबाईंचे कौतुक फक्त स्त्री नाटककार एवढेच नाही, याकडे गांभीर्याने लक्ष द्या! स्त्री शिक्षण, विशेष करून स्त्री-पुरुष सहजीवनाविषयी त्यांचे विचार भविष्य काळाचेही होते. त्यांच्या संवादलेखनातून पात्रांच्या मनोवस्था, त्यामागची कारणमिमांसा हे विचारपूर्वक योजलेले दिसते. श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजींनी जयंतीनिमित्त केलेले हे त्यांचे कार्यविश्लेषण. गोव्यात सावंतवाडी येथील कलावंतिणीच्या घरात हिराबाईंचा जन्म दि.२२ नोव्हेंबर १८८६ रोजी झाला. मुंबई विद्यापीठाला राजाबाई टॉवर बांधून देणाऱ्या धनिक प्रेमचंद रायचंद यांच्या घरात त्या वाढल्या, त्या मावशी भीमाबाईमुळे. मावशीने त्यांना मुंबईत आणून उत्तम शिक्षण दिले.**

संस्कृत, इंग्रजी, बंगाली शिकवणारे शिक्षक घरी बोलावले. पं.भास्करबुवा वखल्यांकडे संगीत शिक्षण झाले. त्यांना स्वतः पदे रचायची आणि चाली लावण्याची गोडी लागली. रायचंदांच्या घरी मुंबईतील अनेक कलाकार, लेखक व उच्चभ्रू व्यक्तींचे येणे-जाणे असे. त्यामुळे त्यांच्या वागण्या-बोलण्याला अदबशीर झळाळी आली. भास्करबुवा वखले यांच्याकडे संगीताचे धडे गिरवणे, उमलत्या वयात लेखनाची गोडी लागल्यावर नाट्याचार्य गो.व.देवल यांचे मार्गदर्शन, पुढे थोर नाटककार श्री. कृ.कोल्हटकरांचा सहवास, आणि भाषाप्रभू राम गणेश गडकरी यांची घरी राबता. एखाद्या हिऱ्याला पैलू पाडायला आणखी अनुकूलता ती कोणती? हिराबाई पेडणेकर या नावाने पहिली मराठी स्त्री नाटककार हा बहुमानाचा किताब मिळाला. ललित कलादर्शनसारख्या नामांकित संगीत नाटक कंपनीने दामिनी हे नाटक चार वर्ष रंगमंचकावर गाजत ठेवले. पुस्तकरूपानेही इंदुप्रकाशने प्रसिद्ध केले. एकोणिसाव्या शतकात कूस पालटली तेव्हा पहिल्या दशकात हे नाव लखलखीतपणे पुढे आले होते. पण नाटककार, कलाकार, साहित्यिक म्हणून पुढे त्यांना मानसन्मान मिळाले नाहीत किंवा त्यांनीही पुढे आपल्या प्रतिभाशक्तीची चुणूक दाखवली नाही.



त्यांच्या बाबतीत, एखादे फूल अकाली कोमेजून जावे तसे झाले.

इ.स.१९०० ते १९११ दरम्यान किर्लोस्कर संगीत नाटक मंडळीचे मालक-नट नानासाहेब जोगळेकरांसमेवत राहात होत्या. कोल्हटकर, गडकरी, गुर्जरांसारखे नाटककार, रेंदाळकर, बालकवींसारखे कवी, मामा वरेरकर, न.चिं.केळकर, चिंतामणराव वैद्य यांसारखे साहित्यिक यांच्या काळात त्या लिहीत राहिल्या. पूर्वी संगीत नाटकांच्या रसिक प्रेक्षकांमध्ये कलावंतिणी भाविणी असत. त्याही आपल्या कलेची उपासना करण्याच्या हेतूनेच येत. कोल्हटकर, गडकरींसारखे नाटककार पदांच्या नवनव्या चाली, चीजा या भाविणींकडून मुद्दाम ऐकत. हिराबाईही अशाच कलाकार होत्या. त्यांनीही अशाच कितीतरी पदे, कितीतरी चिजांच्या प्रेरणा दिल्या. त्यांनी विशीच्या आतच पहिले पूर्ण लांबीचे नाटक लिहीले. ते जयद्रथ विडंबन हे रंगभूमीवर आले नाही,



हिराबाई पेडणेकर जयंती विशेष

परंतु अनेकांनी ते वाचून हिराबाईंची प्रशंसा केली. त्यामुळे नाट्यसृष्टीत त्यांच्या नावाची चर्चा सुरू झाली. चारच वर्षात त्यांनी दुसरे नाटक लिहिले ते दामिनी. हे किर्लोस्कर मंडळींनी करावे, अशी त्यांची फार इच्छा होती. त्यासाठी कोल्हटकरांनी शब्द टाकला नाही, म्हणून त्या नाराज झाल्या होत्या. ललित कलादर्शनने मात्र या नाटकाला खूप यश मिळवून दिले. त्या कविता आणि निबंधलेखन करत. त्यांच्या आणखी एक-दोन नाटकांचा उल्लेख आढळतो. मात्र संहिता उपलब्ध नाहीत. त्यांच्या संवादलेखनातून पात्रांच्या मनोवस्था, त्यामागची कारणमिमांसा हे विचारपूर्वक योजलेले दिसते. त्यांचे संगीतज्ञान तर नाट्यपद लेखनात फारच उपकारक ठरले. पण सर्वांच्या चालींमध्ये विविधता आहे. दामिनी हे स्त्रीपात्र रंगवताना त्यांनी ज्ञानमार्गात स्त्री-पुरुषभेद हे नसावेत, ते कृत्रिम आहेत, असा विचार मांडला. सुशिक्षित स्त्री अधिक परिपक्व असते. ती जीवनाला समर्थपणे सामोरी जाते, असेही रंगवण्याचा जोरकस प्रयत्न त्यांनी केला. नाटकातली नाट्यमयता त्यांच्या कथानकात पुरेपूर होती. चमत्कृतीपूर्ण प्रसंग, ताटातूट, पुनर्भेट, बुवाबाजीवर प्रहार असे अनेक घटक त्यांनी आपल्या नाटकांमधून सुजाणपणे वापरले.

बरीच वर्षे हिराबाई पेडणेकर याच पहिल्या स्त्री मराठी नाटककार असेच विधान होते. पण अभ्यासकांनी नंतर सोनाबाई केरकरांचे छ.संभाजी आणि काशिबाई फडके यांचे संगीत सीताशुद्धी ही नाटके कालानुक्रमे आधीची असल्याची माहिती समोर आली. अर्थात नाट्यगुणांनी संपन्न अशा हिराबाईंच्या लेखनाचे मोल काही त्यामुळे कमी झाले नाही. दुर्दैवाने नानासाहेब जोगळेकर गेल्यानंतर हिराबाईंना मानसिक आणि कौटुंबिक स्थैर्याची गरज अधिक भासली असणार. त्यांनी कृष्णाजी नेने नावाच्या कुटुंबवत्सल गृहस्थाशी घरोबा केला. सारा भूतकाळ विसरताना आपल्या लेखनकलेचेही बोट सोडले. कलावंतिणीचा शिक्का पुसून टाकण्यासाठी त्यांना कलांचाच त्याग करावा लागला. एक सामान्य गृहिणी म्हणून स्थैर्य मिळण्यासाठी मोजावी लागली एवढी मोठ्ठी किंमत! कोण जाणे ती आनंदाने दिलीही असेल. परंतु मराठी भूमी व भाषा मात्र स्त्री भावनानुकूल अशा अधिक नाटकांना मुकली होती, हेच खरे! हरहुन्नरी व्यक्तिमत्वाच्या धनी हिराबाईंनी पालशेत रत्नागिरी येथे दि.१८ ऑक्टोबर १९५१ रोजी अखेरचा श्वास घेतला.

!! त्यांना जयंतीनिमित्त कोटी कोटी दंडवत प्रणाम !!

**कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरुजी.**
**(लोककला व लोकसाहित्यिक चरित्रांचे गाढे अभ्यासक.)**
**मु. रामनगर वॉर्ड क्र.२०, गडचिरोली.**
**पो. ता. जि. गडचिरोली. भ्रमणध्वनी – ७७७५०४१०८६.**

# ओल्या मातीची स्पंदनं



जयप्रकाश दगडे,
लातूर

आधुनिक केसरी

**समृद्धीचा संदर्भपदर निसर्गाला वेढून टाकतो, तेव्हा त्या पदरात लपेटलेला निसर्ग अनावर दानत घेऊन येतो.मराठवाड्यातील लातूरचे सेवानिवृत्त बॅन्क अधिकारी व दिवंगत कवी विजय भोयरेकर यांची कविता असे निसर्गाचे संदर्भ देत आपल्यातील सृजनशीलतेला गतिमान करते, तेव्हा ती कविता समृद्धीवरील कविता होते. भटकताना रानाला काही सवाल करावे... मिळालेले हिरवे जबाब ओल्या मातीत पेरावे...**

समृद्धीचा हा गगनात, वाऱ्यात , झाडांवर व भरलेल्या घनांवर चालणारा सुंदर जलसा भोयरेकरांनी 'जबाब ओल्या मातीचे ' या आपल्या कवितासंग्रहातून आपल्या स्वाधीन केला आहे. काळ्या मातीचा टिळा लावून त्यांची कविता विलक्षण तरल प्रतिमा लेवून येते. कुठंही बनवेगिरी नाही. उगाच चिंतकाचा आव नाही. काही मांडण्याचा अट्टाहास नाही, की कुंथून कुंथून मांडलेला वेदनांचा बाजार नाही. त्यांच्या कवितेची जातकुळी मातीशी नातं सांगणारी आहे.बीजाचं उर्ध्वगामी अंकुरणं त्यांना अधिक खुणावतं. शेतात डोलणाऱ्या हिरव्या स्वप्नांशी ती अधिक जवळीक सांगते. त्यामुळेच या रानवाटा त्यांना भर्जरी शालू नेसल्यागत वाटतात.

***कोसळता वरुनी धारा***
***अंकुरले अवघे रान...***
***आठवात व्याकुळलेले***
***फांदीवर पिकले पान...***

-- अशा आशयगर्भ कवितेतील ही सृजनोत्सुक मातीची कूस माणसाची अभंग जीवनेच्छा पांघरुनच येते. ताकदीच्या प्रतिमा घेऊन भोयरेकरांचे शब्द येतात, तेच मुळी सकारात्मक आश्वासकतेची पेरणी करीत !

नाटकी आवेशानं फोडलेला टाहो तीत नाही. रानाचं भणंगपण, शेतीतली उध्वस्तता, जीर्ण लक्तरं पांघरलेलं जिणं हा त्यांच्या लेखणीचा मुळात विषयच नाही. सरसरून पान वर यावं, तशी त्यांची कविता कातळ भेदून सरसरून वर येते नि आभाळभर व्यापून राहते.

***पाट वाहतो..***
***एका हिरव्या***
***पात्याची मी..***
***वाट पाहतो...***

-- असे साय पांघरलेले त्यांचे शब्द डेरेदार झाडांचं समृद्धपणच सांगतात.

' जबाब ओल्या मातीचे ' मधील अनेक प्रतिमा ऐसपैस आहेत. किंबहुना अशा प्रतिमा हीच भोयरेकरांची बलस्थाने आहेत. या प्रतिमा रंग, गंध, स्पर्श, नाद, दृक् , गती या संवेदनांनी सजीव अन् सजग झालेल्या आहेत. कधी कधी या प्रतिमा भोयरेकरांच्या वैयक्तिक अनुभवांची कक्षा व्यापक करतात.

एकीकडे खडकाळ वास्तवाची दाहकता अन् पल्याडची डोंगरमग्न संन्यस्त हिरवी तरुणाई...मधलं हिंदोळ्यावरचं जगणं म्हणजे जणू वैराण एकाकी आभाळात गोंदणच ! मुसळधारांच्या अनावरपणात दडलेली ही आषाढभिजली हिरवी हाक ऐकावी नि दुःखाच्या काट्यावर आनंद तोलावा. भोयरेकरांची कविता अशा जगण्याशी नातं सांगते .

***आला चैताचा महिना***
***रानी फुलले पळस...***
***पाही रानीचं कवतिक***
***उंच डोंगरी कळस...***

- असे पंखबळावर नवे मंगलमंत्र घेऊन खग आले, की घनतिमिराचे कवच भेदून नवा थवा उडू लागतो.असे नवे थवे मग नवक्षितिजावर केवळ उजेड मांडत येतात. जणू चैत्रजागरच सांडत येतात. धुळीवर उद्याच्या भव्य निर्मितीचे कोश असे दिसू लागतात. झाडांचा म्हणून एक वसा असतो. तो घ्यावा लागतो. एकदा तो घेतला, की माणसं उतत नाहीत. मातत नाहीत. आणि रस्ते बेईमान झाले, तरी हे हिरवेपण आयुष्याला अर्थ देत राहते. पदरात प्रसन्नता बांधून देणारा हा अनुभव भोयरेकर अशा शब्दांत मांडतात :

***शिशिरामधल्या पानगळीचे***
***अश्रू नको सांडू...***
***वसंतातल्या हिरवाईचा***
***खेळ नवा मांडू ...***

माणसांच्या मनाचा हिरवेपणा गिळून टाकणारी जगरहाटी भवताली असताना , अशा विमनस्क अवस्थेत ही हिरवीकंच नवलाई आमचा ऐन श्वास बनणार आहे की नाही ? शाश्वत निसर्गाचं हे स्वगत भरभरुन ऐकणारी मनं तयार होणार आहेत की नाही ? तशी ती होणार नसतील, झाडांचं हे हिरवेपण आपल्या रक्तातून वाहणार नसेल, तर आपले इतर उत्सव भलेही उसन्या अवसानानं आपण साजरे करु, फुलांचे नि तरुवरांचे उत्सव मात्र साजरे करण्याचं भाग्य आपल्या वाट्याला येऊ शकणार नाही. सिमेंटच्या निष्प्राण जंगलात आमचे ते झाडांचे पार हरवले. निथळते रंगमेळ चिडीचूप झाले. पाना-फुलांनी झाकलेली ऊबदार घरं नजरेआड झाली. अशी दृष्टी झाकोळून टाकणारी भकास भगभग पुढच्या पिढ्यांच्या लल्लाटी बांधणं भोयरेकरांना मंजूरच नाही. हिरव्या पालवीची हरवत चाललेली शाश्वती देणारी कविता म्हणूनच भोयरेकरांच्या लेखणीचा विषय होऊन बसली आहे.फांद्यांना शब्द फुटताना झाडांचं झालेलं गाणं ते कान भरुन ऐकतात. हिरव्या अक्षरातलं हे गोंदण ओंजळीत जपतात. झाडांच्या आणा- शपथा कुरवाळतात. त्यामुळंच आयुष्याची संध्याकाळ जवळ आली, तरी ती त्यांना फारशी जाणवत नाही. भोयरेकरांचे शब्द असे पाना-पानांत उजळून निघाले आहेत :

***चार सुकलेल्या बिया***
***रानवाऱ्यानं उडाल्या...***
***थोडी***
***पाहुनिया***
***ओल***
***माझ्या मातीत बुडाल्या...***




ओल्या मातीत काय नसतं ? ओली माती म्हणजे नवसृजनाची आस. ओली माती म्हणजे चैतन्याचा कोंभ. ओली माती म्हणजे हिरव्या स्वप्नांचा ध्यास.ओली माती म्हणजे भविष्य पाहण्याची दृष्टी. ओल्या मातीच्या दृष्टीत असते भविष्यातली सृष्टी. भोयरेकरांचं अनुभवविश्व बहुपेडी. ते शिक्षक होते. प्राध्यापक होते.बॅन्क अधिकारी होते.असा अफाट अनुभवांचा कॅन्व्हास पाठीशी असतानाही व्यक्तिसापेक्षता टाळून त्यांची कविता सबंध निसर्गालाच कवेत घेऊन पाहते. त्यामुळे त्यांच्या कवितांचा पोत सर्वेशाम सारखा वाटेलही. पण मला तो कवीचा दोष वाटत नाही. चारोळ्यांना हल्ली बरे दिवस आलेत. म्हणून भोयरेकरांनी हा लोकप्रिय फॉर्म हाताळलाय् असं वाटत नाही. मुळात रुढार्थानं त्या चारोळ्याच नाहीत. मळलेल्या वाटेनं जाणं भोयरेकर नाकारतात. स्वच्छ व प्रांजळ मराठीत इतकी उत्कट कविता लिहिणारे कवी सहसा वाचनात येत नाहीत. भोयरेकरांची कविता गळ्यात हात न घालता थेट काळजात कधी शिरते , हेही कळत नाही.

***आली रातकिड्या जाग***
***गाती धृपद-धमार...***
***ऐके अंधारी मैफल***
***कान देऊनी शिवार...***

-- असा त्यांच्या कवितेत एकाच वेळी सुकोमलता, विमुक्तपणा , संयम, मार्दव, गांभीर्य आणि नाजुक भावसौंदर्य यांचा एकदम प्रत्यय येतो. कधी कधी त्यांची कविता कड्यावरून अंग झोकून देणाऱ्या जलप्रपातासारखी खाली कोसळताना दिसते.अशा वेळी तिचा जोश, तिचा नाद, तिचं सामर्थ्य , तिची अवखळ झेप आपलं मन वेधून घेते. तर कधी लपत-छपत हिरवळीतून वाहणाऱ्या एखाद्या झुळझुळ निर्झराप्रमाणे ती अंग चोरुन नाजुकपणानं अवतरते, तेव्हा तर ती चित्रमयीच बनते ! तरल संवेदना हे ' जबाब ओल्या मातीचे ' चे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल :

***देहाने पडावे***
***तुझ्या मुळापाशी,***
***हिरवे हात माझे***
***भिडावे नभाशी...***

माणसं ओळख विसरतात. आसवं विसरतात. दूध विसरतात. रक्तही विसरतात.दिठी विसरतात आणि अंधारात तेवत विझत चाललेल्या वातीही विसरतात. भोयरेकरांनी ही घुसमट, घालमेल दूर करीत, डेरेदार झाडांचं समृद्धपण माणसांचं जगणंही कसं आश्वासक करतं, हे इथं सांगून टाकलंय्.

रोजमर्रा जगण्याच्या गर्दीत हरवलेली उमर त्यांना अशी ओल्या मातीनं दिलेल्या जबाबांमध्ये सापडली आहे. म्हणूनच ओल्या मातीचे हे जबाबही झालेत...लाजवाब !!

**कविता संग्रह नाव- 'जबाब ओल्या मातीचे ...'**
**कवी : स्व. विजय भोयरेकर**
**मुखपृष्ठ : विजय भोयरेकर**
**प्रकाशन : विद्याभारती प्रकाशन,**
**लातूर, पाने : 79, किंमत : 30 रु.**



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# सावरकर विरोधात गांधी, पण का?

आधुनिक केसरी

**काँग्रेसचे नेते व खा. राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रे दरम्यान क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या जयंतीच्या कार्यक्रमात पुन्हा एकदा स्वातंत्र्यवीर वि. दा.सावकरकर यांना लक्ष्य केले. त्यांनी सावरकरांनी काँग्रेसला विरोध करण्यासाठी इंग्रजांना मदत केली. तसेच अंदमानातील शिक्षा कमी व्हावी म्हणून त्यांनी इंग्रजांना माफीचे पत्र दिले,ते देशभक्त नाहीत. ते इंग्रजांकडून निवृत्ती वेतन घेत होते. त्यांची विचारधारा देशाला तोडणारी आहे, अशी मुक्ताफळे उधळली आहेत. त्यांच्या वक्तव्याबद्दल भाजपा, सावरकरप्रेमी संताप व्यक्त करत आहेत. यात महाविकास आघाडीबरोबर असलेल्या उध्दव ठाकरे सेनेची मात्र पंचायत झाली आहे.**

परवा काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेत गांधी व आदित्य ठाकरे यांची गळाभेट झाली.या दोघांनी हातात हात धरताना पदयात्रा केली. काँग्रेसचे स्पष्ट म्हणणे की, पदयात्रा ही भाजपा व आर,एस. एस.विरोधात म्हणजे हिंदुत्वाचा विरोधात आहे. मग ठाकरे सेना या पदयात्रेत सहभागी कशी? ठाकरे शिवसेनेला सावरकर विचार मान्य,असे स्पष्टीकरण दिले आहे. मग मित्र पक्ष काँग्रेस पक्ष सावरकरांची खिल्ली उडवित असताना,त्यांचा अपमान करत आहे,त्यांना देशद्रोही ठरवितो. तरी ठाकरे सेना गप्प का बसते ? इतका लाचारपणा सत्तेसाठी ना? शिवसेनाप्रमुख ठाकरे असते तर सावरकर विरोधकांचे 32 दात पाडले असते? ठाकरे शिवसेना भारत जोडो यात्रेत सहभाग झाली, तेंव्हा त्यांचे काँग्रेस हिंदू विरोधी विचाराचे समर्थन नाही काय? असा प्रश्न विचारला जात आहे.गांधी हे वारंवार सावरकर,राष्ट्रीय स्वंयसेवक संघ,आणि भाजपावरील आरोपांचे तुणतुणे वाजवित आहेत.त्यांचा 'बोलवता धनी' दुसरा असावा? भाजपाला बदनाम करण्यासाठी सावरकरांना लक्ष्य करत आहेत. खर तर, आधुनिक गांधी हिंदू धर्माचे विचाराचे अभ्यासक, विचारवंत, संशोधकही नाहीत. सावरकारांचे हिंदुत्व काय आहे? याचीही त्यांना अभ्यास नाही. त्यांच्या साहित्य,विचारांचे चिकीसक नाहीत? ते केवळ व्देषातून सावरकरावर टीका करत आहेत.विचारवंत कधी बेताल वक्तव्य करत नाही,तो विरोधी विषयाची चित्कीसा करून निष्कर्ष काढून आपले विचार लिखणीव्दारे मांडत असतो. या गांधींनी सावरकरांच्या विचारावर मंथन करून पुस्तक प्रकाशित केले आहे काय? सावरकर हे राजकीय बुध्दीवादी नेते होते. त्यांच्या विचाराची उंची लक्षात घेता त्यांचेवर शितोंडे उडविण्याची, टीका करण्याची तेवढी पात्रता तरी असावयला पाहिजे.ती त्यांच्यात आहे काय? सावरकरांवर टीका करणारे 'टीकोजीराव' आहेत तरी कोण?भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीत यांचे काय योगदान आहे? स्वातंत्र्यापूर्वी काँग्रेस ही चळवळ,संघटना होती.म्हणून म. गांधींनी तर स्वातंत्र्यानंतर काँग्रेस बरखास्त करण्याची सूचना केली होती.मुळात काँग्रेसची स्थापना १९८५ ब्रिटीश अधिकारी 'अॅलन ह्युम' या ब्रिटीश अधिकाऱ्याने केली आहे. या काँग्रेसचे१९६९ व१९७६ या दोन वेळेस विभाजन झाले. तेंव्हा मूळ काँग्रेस राहिलीच नाही,आताचा पक्ष सोनिया व राहूल गांधी परिवाराचा आहे.काँग्रेस व इंग्रजाचे किती मधूर सबंध होतेच ना? मग स्वातंत्र्यानंतर इंग्रजाची कोणी? कशी मदत घेतली? तेंव्हा पंडित नेहरू यांनी २ सप्टेंबर १९४६ मध्ये सरकार स्थापन केले होते. तेंव्हा भारतीय घटना अस्तित्वात नव्हती!तेंव्हा मग त्यांनी कोणती शपथ घेतली? तेंव्हा नेहरूंनाही इंग्रजांची मदत घ्यावी लागली होती. मग पंडित नेहरूंना काय म्हणायचे? काँग्रेसचे स्वातंत्र्यात योगदान आहे.तेंव्हा काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाकडून गंभीर चूकाही झालेल्या आहेत.नेहरू, गांधी आणि सावरकर यांच्या विचारात मतभिन्नता असू शकते,पण त्यांना राष्ट्रद्रोही म्हणणे मूर्खपणाचे आहे.या नेत्यांच्या भूमिका,धोरणावर चर्चा करणे गैर नाही.पण राष्ट्रीय नेत्याबद्दल अवमान करणारा शब्द वापरले जरी जात आहे,तो कोणी सहन करणार नाही.त्यात भारताचा अमृत महोत्सवी वर्षात आपल्या राष्ट्रीय नेत्यांची,देशाची बदनामी करत आहोत,याचे त्यांना भान नाही.यात काँग्रेस अत्यंत घाणेरडे राजकारण करत आहे.काँग्रेस पक्ष सावरकरांना जाणीवपूर्वक टार्गेट करत आहे. कारण ते प्रखरपणे हिंदू धर्माचे नेतृत्व करत होते, म्हणूनच ना! पक्षाचा तोच अजेंडा आधुनिक गांधी पुढे नेते आहेत. कारण हे त्यांचे वैयक्तीगत मत नाही,हीच पक्षाची विचारधारा,धोरण आहे.काँग्रेस आज जबाबदार विरोधी पक्ष आहे. पक्षाकडून पंतप्रधान,राष्ट्रपतींही अवमान केला जात आहे. विरोधी पक्षाचा सत्ताधारी पक्षावर अंकूश असला पाहिजे!यात दूमत नाही,विरोध सरकारच्या धोरणाच्या,निर्णयाच्या, सकारात्मक विरोध असला पाहिजे.पण केंद्रातील भाजपा व मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला उठसूठ विरोध केला जात आहे.भाजपाच्या चांगल्या निर्णयाचे समर्थन करण्याचे काँग्रेसमध्ये धाडस नाही. केवळ मोदी व भाजपा विरोध हेच काँग्रेसचे धोरणच बनलेले आहे.काँग्रेस पक्षातील 'विचाळवीरांना' अभय दिले जात आहे. पक्षाचा नेताच 'वाचाळवीर' असेल तर पक्षतही विचाराच्या प्रवाहात प्रदूर्षण होणारच!त्यात विचाराची गटार गंगा उलटी थोडीच वाहणार आहे! पक्षाचे दैवत आधुनिक गांधी यांनी सावरकरावर माफी मागितल्याचा व निवृत्ती वेतन घेत असल्याचा आरोप जो केला आहे.सावरकरांनी इंग्रजाला माफी मागितली,हे काँग्रेस पक्षाला केंव्हा माहित झाले? जेंव्हा पाकिस्तान समर्थक सर्वोच्च न्यायालयाचे वकील अब्दुल गफूर यांनी २००१ मध्ये सरकारकडून सावरकरांविषयांची अनेक पत्रे मिळविली, तेंव्हा पत्रातून त्यांनी सावकारांनी इंग्रजांची माफी मागितली प्रथम सवाल केलेला होता?त्यांनी त्यावर पुस्तक काढले.तेंव्हा काँग्रेसला जाग आली.पक्षाने त्यांचे उष्टे विचार उचलले आहेत? काँग्रेस पक्षाचा भाजपा बदनाम करण्यासाठी मुद्दा पाहिजे तो सापडला. तेंव्हा- पासून सावरकरांची बदनामी करण्याचा सपाटा सुरू केला झाला आहे. काँग्रेसला तोपर्यंत सावरकरांचे माफीचे प्रकरण माहित नव्हते.ही वस्तुस्थिती आहे.त्यात केंद्रात भाजपाचे वाजपेयीचे सरकार आल्यानंतर अंदमान येथील कारागृहाला सावरकर स्मृतीस्थळ व पर्यटननाला दर्जा दिला गेला.त्या ठिकाणी सावरकरांची माहिती फलक लावले गेले. पण एका काँग्रेस नेत्यांनी वीर सावरकरांचे फलक उध्वस्त करण्याचा प्रयत्न झाला. यावर दलित पँथरचे नेते नामदेव ढसाळ यांचा २१ ऑगस्ट २००४ सामनामध्ये लेख प्रसिध्द झाला होता.त्यांनी आचार्य अत्रे असते तर सावरकरांची बदनामी करणाऱ्याला काँग्रेसच्या जंतूला जोड्याने मारले असते,असे त्यात म्हंटले आहे.आज तेच ज्वलंत हिंदुत्वाचे असलेले वृत्तपत्र काँग्रेसचे गोडवे गात आहे.



काँग्रेसच्या आधुनिक गांधींनी सावरकरावर केलेल्या आरोपाबाबत विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांचे म्हणणे असे की 'न्यायालयात खटला चालू असताना शिक्षेच्या विरोधात माफीची विनंती करता येते.अशावेळी न्यायालयाला शिक्षा कमी देण्याचा अधिकार आहे. पण शिक्षा दिल्यानंतर ती कारागृहात भोगत असताना त्या शिक्षेत सूट अधिकार सरकारला आहे. सावकर यांना न्यायालयाने शिक्षा सुनावण्यात आली होती. ते कारागृहात शिक्षा भोगत होती.या शिक्षेची सूट मागणे, त्यासाठी विनंती पत्र देणे हा प्रक्रियाचा भाग आहे,ते चुकीचे नाही. पत्रावर 'आपला आज्ञाधारक सेवक असे इंग्रजीत लिहिण्याची प्रथा होती. तसे सावकरांचे पत्र लिहलेले आहे.सावकारांनी करागृहात असताना १९१३ -१९२० पर्यंत पाच पत्रे दिली होती.पण ब्रिटीश सरकारने त्यांना शिक्षेत सूट दिलेली नाही.उलट सावरकारांना शिक्षेत सूट दिली गेली तर ते पुन्हा ब्रिटीशांच्या विरोधात लोकचळवळ उभी करतील,अशी ब्रिटीशांना भीती होती.तेंव्हा ब्रिटीशांनी त्यांच्या शिक्षेत सुट देण्यास विरोध केलेला होता. सावरकरांना अंदमान करागृहात दहा वर्षे ठेवले गेले होते,तेथे त्यांना अमानुष वागणूक दिली गेली. एका छोट्याशा खोलीत त्यांना डांबून ठेवले गेले.त्यांना खोलीच्या बाहेर सुध्दा येण्याची परवानगी दिली गेली नाही. त्यांनी अनंत यातना सहन कराव्या लागल्या.अंदमानची वसाहतच बंद केली गेली,त्यानंतर सावरकरांना देशातील विविध कारागृहात ठेवले गेले. त्यानंतर सावरकारांना रत्नागिरी येथे तीन वर्षे स्थानबध्द करण्यात आले. त्यावेळी स्थानबध्द केलेल्या राजकीय कैद्यांना निर्वाह भत्ता नियम होता. तो घरभाडे व जेवण, रोग्य आदीसाठी खर्च करावा,यासाठी दिला जात, असे सावरकरांचे संपूर्ण कुटुंबच स्थानबध्द केले होते, त्यांना तीनवर्षे घराबाहेर पडण्यास मनाई होती.तो निर्वाह भत्ता म्हणून प्रतिमहिना ६० रूपये निर्वाहभत्ता दिला गेला आहे. सावरकारांनी स्वतः लिहिलेल्या 'माझी जन्मठेप' या पुस्तकात मी शिक्षेची सूट का मागितली? याची सविस्तपणे माहीती दिलेली आहे.तसेच सावरकर इतर राजकीय कैद्यांनी शिक्षा सूट देण्यासाठी पत्र देऊन करागृहाबाहेर पडावे, असा सल्ला देत होते.'असे प्रा.मोरे यांनी सांगितलेले आहे.यावरून गांधीनी सावरकरांचे ते पुस्तकच उघडून वाचले नसावे,अथवा त्यांच्या माहितीवर विश्वास नसेल.मात्र अब्दुल गफूर यांच्या सावरकर विरोधी माहितीवर विश्वास आहे.सावरकरांच्या माहिती व विचाराकडे काँग्रेस डोळेझाक करत आहे.क्रांतीवीर भगतसिंह यांना फाशी झाली होती तेंव्हा त्यांनी शिक्षा माफ करावी,यासाठी पत्र दिले असते,तर ब्रिटीश सरकार फाशीची शिक्षा रद्द झाली केली असती काय?याचे उत्तर काय? स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात भाजपा



व शिवसेना युतीचे सरकार असताना भ्रष्टाचाराचे पुरावे व सिध्द करता न आल्याने न्यायालयाने ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना तीन वर्षाची शिक्षा सुनावली गेली होती.तेंव्हा राज्य शासनाने त्यांची शिक्षा कमी करून मुक्तता केली.मग त्यांना काय म्हणणार?तेंव्हा राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांनी शिक्षेतील केवळ सूट मिळावी पत्र दिले म्हणून त्यांना माफीवीर ठरविणार काय? ब्रिटीश राजवटीच्या विरोधात संघर्ष करणारे राष्ट्रपुरूष हे करागृहात तडफडून मृत्यू पावले पाहिजे होते काय? अशी म्हणणे आहे की काय? राष्ट्रासाठी कठोर शिक्षा भोगणाऱ्या राष्ट्रपुरूषाला 'कायर' ठरवित आहोत,याची लाज तरी कशी वाटत नाही. सर्वच राष्ट्रपुरुष करागृहात गेले तर संघर्षाचे नेतृत्व मग कोण करणार?अशावेळी करागृहात सडून मरण्यापेक्षा बाहेर पडून ब्रिटीशांच्या विरोधात पुन्हा संघर्ष करणे,यात चूक कोणती ? तो एक गनिमीकावाचा भाग आहे.सावरकर प्रमाणे म.गांधी व नेहरूंनी पत्रे दिलेली आहेत. त्यांनी पूर्ण शिक्षा भोगली का? १९२३ मध्ये पंडित नेहरूंना शिक्षा झालेली होती. त्यांची कैदेतून मुक्ताता व्हावी म्हणून त्यांचे वडील मोतीलाल नेहरू यांनी लेखी शपथपत्र दिले होते.राहूल गांधी पत्रात शेवटी YOUR EXCELLENCY'S OBDT. SERVANT.या शब्दाचे भाषांतर इंग्रजांचे नोकर असा केले आहे. म. गांधीजींच्या पत्रात अशाच शब्दाचा उल्लेख आहे. तसेच जगविख्यात अमिरेकेचे माजी राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी सुध्दा पत्रात याच शब्दांचा उल्लेख आहे.याअर्थ ते नोकर असा होतो काय? पत्रात पाठविणाऱ्या व्यक्तींचा आदरपूर्वक उल्लेख करण्याची पध्दत होती,यावरुन या आधुनिक गांधीचा अज्ञानपणा उघडकीस आला. नंतर त्यांची बोलती बंद झाली.मग त्यांनाही माफीवीर म्हणणार काय? सावरकरांइतकी कठोर शिक्षा,यातना भोगल्या.त्याप्रमाणे काँग्रेस नेत्याच्या वाट्याला अशी शिक्षा आली होती काय? सावरकर करागृहातून बाहेर आल्यानंतरही स्वस्थ बसले नाहीत.हिंदुनो संघटीत व्हा! जागे व्हा असे आवाहन करत होते.त्यांनी आपले धर्मग्रंथ कपाटात ठेवा,'जाती -पातीला मूठमाती द्या' असे सांगितले आहे.त्यांनी तेंव्हा हिंदू कोणाला म्हणावे? असा प्रश्न केला होता.भारतात जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती हिंदू व हिच त्याची पुण्यभूमी आहे,असे म्हंटलेले आहे. सावरकरांचे हिंदू धर्माबाबत भूमिका,विचार स्पष्ट आहेत.याचे या गांधींना ज्ञान नाही.ते अर्धवट माहिती घेवून आरोप करत सुटले आहेत. झारखंड मधील मोदी सरकार च्या "मेक इन इंडिया" या योजनेवर टिंगल करताना घसरले व त्यांनी यातून "रेप इन इंडिया"असे वक्तव्य केले होते. त्या वक्तव्यावर त्यांनी माफी मागावी,अशी भाजप सदस्यांनी संसदेत केली होती.तेंव्हा 'मी राहुल सावरकर नाही' असे म्हणाले होते.तसेच मोदींना "चौकीदार चोर है" म्हणत न्यायालयाचा हवाला दिला,तेंव्हा ते स्वतः अडचणीत आले होते. तेंव्हा त्यांनी न्यायालयात माफी मागितली,मग त्यांना माफीवीर का म्हणू नये?त्यांच्या बेताल वक्तव्याचा आधार पाकिस्ताने आंतरराष्ट्रीय न्यायालयात घेतला होता.गांधीजींची हत्या आर. एस.एस. ने केली,असा आरोप केला होता,यावरुन ते न्यायालयात चकरा मारत आहेत.संसदेत गांधी फारसे बोलत नाहीत,तेथे 'येडेचाळे' करतात.ते कधी डोळा मारतात,पंतप्रधानाशी गळा भेट घेतात.त्यांच्या या बालीश वागण्यामुळे फजिती होते,राजकीय विनोदही घडतो.काँग्रेस पक्षात गांधी घराण्याचे नेतृत्व कायम रहावे,यासाठी उद्देशाने दिल्लीत "भारत बचाओ" सभेचे आयोजन गेले होते.काँग्रेस नेत्यांनी मोदी सरकारवर धोरणांवर टीका करणे,तो त्यांचा अधिकार आहे.भाजपने 'गांधी' हे उसने आडनाव नाव लावून कोणी गांधी होत नाही,असे,म्हणत त्यांना आरसा दाखविला. त्यांना दगड मारून चिखल स्वतः च्या अंगावर चिखल उडवून घेण्याची सवय आहे. स्वतःचे मूळ शोधणाऱ्या गांधींची कुळ शोधले तर मग पंचायत होते. त्यांचे तरी खरे आडनाव काय आहे? त्यांचे आजोबा फिरोजखान श्रीमती इंदिरा गांधी यांचेशी "निकाह" केलेला होता. फिरोजखान यांच्या मृत्यूनंतर दफन करण्यात आले. त्यांची कबर उत्तर प्रदेशातील प्रयागराज (अलाहाबाद) येथे आहे. गांधी अंधारात कबर पहाण्यासाठी गेले होते. राजीव गांधी यांचा सोनियांशी विवाह केला. त्या मुळच्या इटालीतील विसेन्जा या खेड्यातील. त्यांचे मूळ नाव 'एंटोनिया माइनो' असे आहे. त्या विवाह करून भारतात आल्या. त्यांनी पंधरावर्षा नंतर १९८३ मध्ये भारतीय नागरिकत्व मिळवले व त्या संसदेपर्यंत पोंहचल्या.राहूल गांधी याचे खरे नाव काय आहे? असे विचारले तर. त्यांनी तर दोन देशाचे नागरिकत्व स्वीकारल्याचा आरोप आहे.सोनियांचे पंतप्रधानांचे स्वप्न होते.ते नेते शरद पवारांमुळे धूळीला मिळविलेले आहे. तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व राहूल यांच्या आजी श्रीमती इंदिरा गांधी ह्या सावरकरांनी ब्रिटीश सरकार विरोधात केलेल्या संघर्षाचे कौतूक करतात तर दुसरीकडे अज्ञान नातू राहूल गांधी हा स्वातंत्र्यवीर सावरकरावर,त्यांच्या राष्ट्रप्रेमावर प्रश्न चिन्ह उभे करत आहेत? हा विचारात फरक आहे.स्वांतत्र्यांचा लढ्याचा,इतिहास हा केवळ गांधी व नेहरू घराण्यापुरता मर्यादित नाही.राष्ट्राच्या स्वातंत्र्याच्या लढ्या अनेक क्रांतीविरांनी बलिदान दिलेले आहे.त्यांच्या घरादाराची राखरांगोळी झाली. या गांधींना चौफेकर बधूं माहित आहे काय? काँग्रेसला हुतात्मांचे स्मरण होत नाही.केवळ नेहरू, गांधी परिवाराने देशासाठी बलिदान केले हेच माहीत आहे. हिच त्यांची संकुचित वृत्ती आहे. इंदिरा गांधी व राजीव गांधी यांची घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे हत्या झालेली आहे.देशात पंतप्रधानांची हत्या करणे निषेधार्थ आहे,त्याचे समर्थन होऊ शकत नाही. पण काँग्रेसला इतर हुतात्म्यांच्या बलिदानाचे आठवण होत नाही.त्याचा विसर पडतो.संसदेत आधुनिक या गांधीनी "तुमचे सावरकर, आमचे गांधी' असाही शब्द प्रयोग केला होता.गांधी व सावरकर हे राष्ट्रपुरूष होत, भारतमातेचे सुपूत्र होते. महात्मा गांधी व आणि सावरकर या दोघांचेही विचार एकमेकाच्या अगदी परस्पर विरोधी होते.गांधीजींनी आयुष्यभर सत्य व अहिंसेचा जयघोष केला.तर वीर सावरकर यांनी आयुष्यभर अतिजहाल क्रांतीचे समर्थन करत राहिले.यांच्यात वैर नव्हते अथवा त्यांनी एकमेकाचा व्देषही केलेला नाही.दोन्ही राष्ट्रीयपुरूष हे राजकीय क्षितिजावरील दोन विरोधी ध्रूव होते.हे आधुनिक गांधी इतके परिपक्व नेते आहेत काय ? असा प्रश्न निर्माण होतो.राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेता राहुल गांधी हे जबाबदारीने बोलतील,तसे वाटत होते.पण त्यांचा 'थिल्लरपणा' गेलेला नाही.त्यांनी अंदमान- निकोबार येथे जाऊन करागृह व सावरकरांना ज्या कोठडीत होते,तेथे जाऊन पहावे,त्याशिवाय त्यांना सावरकर कळणारच नाहीत महात्मा गांधीच्या हत्येत सावरकरांना गोवण्याचे षडयंत्र काँग्रेसने रचले होते. याचा उलगडा इतिहास संशोधक प्रा. शेषराव मोरे यांचे 'गांधी हत्या व सावकरांची बदनामी' हे पुस्तकात आहे.वीर सावरकरांचा महात्मा गांधींजींच्या हत्येशी सबंध नाही,असे न्यायायलाने १९४९ मध्ये दिलेल्या निकालात म्हंटले व त्यांना निर्दोषमुक्त केले गेले आहे.पण राहूलबाबांना तेही मान्य नाही.त्यानंतर तब्बल अठरा वर्षानंतर काँग्रेस सरकारने १९६६ मध्ये कपूर आयोग नेमला गेला.या आयोगाचा अहवालच घटनाबाह्य आहे.त्या अहवालाचा आधार घेत काँग्रेस सावरकरांचा म. गांधी हत्येत त्यांचा सहभाग होता, असा सतत आरोप करत आहे. काँग्रेसचा सावरकरांबद्दल व्देष इतका टोकाला गेला आहे की, २००४ वाजपेयी काळात संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये २००४ मध्ये वाजपयी सरकारने सावरकरांच्या तैलचित्र लावण्याचा कार्यक्रम होता तेंव्हाही काँग्रेस इतर पक्षांनी या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला. सावरकरांच्या विरोधात २००४ अब्दूल नुरानी यांचे सावरकर- हिंदूत्व -गोडसे कनेक्शन आणि २००७ तुषार गांधी यांच्या"लिटस् किल गांधी" पुस्तकांनी काँग्रेसला बळ मिळाले.त्यानंतर श्रीकांत शेट्ये यांची 'माफीवीर सावरकर 'यांचे पुस्तक प्रकाशित झाले. सावरकरांची ज्वलंत देशभक्त सुधारक, साहित्यिक, कवी,बुद्धीवान राजकारणी अशी विविध पैलूंनी त्यांची ओळख आहे. सावरकरांनी इंग्रजाविरोधात संघर्ष केला वर्षाची दोन वेळेस जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली.अंदमानच्या कारागृहात असताना त्यांनी विटाच्या तुकड्यांनी भिंतीवर सहा कविता, पाच पुस्तके लिहिली आहेत. त्यांची प्रखर देशभक्ती, जनमानसातील उज्वल प्रतिमा कलंकित करण्याचा प्रयत्न होत आहे. काँग्रेसला सत्तेसाठी भाजपाला शह द्यावयाचे आहे. त्यासाठी सावरकरांना लक्ष्य केले जात आहे. यातून काँग्रेसची अल्पसंख्याकांची 'व्होटबँक" पुन्हा मजबूत होईल, हाच या मागचा उद्देश आहे.



आधुनिक केसरी

# संत एकनाथ महाराज

संत एकनाथांचा जन्म संत भानुदासांच्या कुळामध्ये देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण कुटुंबात 1533 साली पैठण येथे झाला. एकनाथ यांचे पंजोबा श्री भानुदास (1448-1513) होते, पंढरपूर येथील विठ्ठल पंथातील प्रमुख व्यक्ती होते. त्यांच्या आईचे नाव रुक्मिणी तर वडिलांचे सूर्यनारायण होते. बालपणीच आई-वडील वारल्यामुळे एकनाथ पोरके झाले. आजोबांच्या छत्रछायेत ते लहानाचे मोठे झाले. आजोबांनी त्यांच्यावर सुसंस्कार केले. एकनाथांना लहानपणापासून अध्यात्माची व हरिकीर्तनाची आवड होती. गिरिजाबाई नावाच्या मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला. गिरिजाबाई अतिशय गृहकुशल होत्या. एकनाथांना गोदा व गंगा नावाच्या दोन मुली आणि हरिपंडित नावाचा एक मुलगा होता. त्यांनी प्रपंच आणि परमार्थ यांची कुशलतेने सांगड घातली.

**एकनाथांचे गुरु आणि शिक्षण :**

छोट्या एकनाथ गुरुचरित्राचे महत्त्व पाहून प्रभावित झाले होते. आपल्या गुरूंना कसे भेटता येईल यावर ते सतत इतरांना विचारत होते. आजूबाजूचे विद्वान लोक चकित झाले आणि त्यांनी गोदावरी नदीला विचारायला सांगितले. म्हणून दुसऱ्याच दिवशी एकनाथ नदीकडे गेला आणि त्याने आपला प्रश्न मोठ्या मनापासून आणि तत्परतेने विचारला. आणि असीम दयाळू आईने उत्तर दिले! 'तुमचे गुरु दौलताबाद किल्ल्यात थांबले आहेत', लहान एकनाथांना सांगितले. तो तातडीने दौलताबादला घराबाहेर पडला! जनार्दन स्वामी हे दौलताबाद किल्ल्याचे प्रमुख होते. ते दर गुरुवारी रजेवर जात असे. तो एक दिवस होता, जेव्हा किल्ल्याच्या पायऱ्यांवर दृढनिष्ठपणे चढणारे 5 वर्षांचे एकनाथ जनार्दन स्वामींच्या भेटीस आले. जनार्दन स्वामी यांनी त्यांचे 'मी तुझीच वाट पाहत होतो' या शब्दाने स्वागत केले. गुरु नेहमी वाट पाहतो आणि जाणतो की योग्य शिष्य कधी येईल. जनार्दन स्वामींनी पुष्कळ भक्तीभावाने छोट्या एकनाथांना पूजेची तयारी करण्याचे काम सोपवले, ज्याने गुरुला अतीव प्रसन्न केले.

अशा प्रकारे एकनाथांनी वयाच्या बाराव्या वर्षी देवगिरी येथील जनार्दनस्वामींचे शिष्यत्व स्वीकारले. तेथे सहा वर्षे राहून संस्कृत ज्ञानेश्वरीसारख्या अध्यात्मग्रंथांचे व शास्त्रपुराणांचे त्यांनी अध्ययन केले. गुरू जनार्दन स्वामी समवेत एकनाथ तीर्थयात्रेस निघाले. ते दोघे गोदावरीच्या तीरावरील चंद्रावती या गावी आले व चंद्रभट या ब्राह्मणाकडे उतरले हा ब्राह्मण दिवसा काम करून रात्री प्रवचन करत असे. त्या दिवशी चंद्रभटचे चतुःश्लोकी भागवतावरील व्याख्यान गुरू-शिष्यांनी ऐकले.

पुढे या गुरू-शिष्यासमवेत चंद्रभटही तीर्थयात्रेस निघाले. पुढे त्र्यंबकेश्वर येथे पोहोचल्यानंतर जनार्दननांनी एकनाथांना 'चतुःश्लोकी भागवत' यावर टीका लिहिण्यास आज्ञा केली. तिथेच चतुःश्लोकी भागवत हा ग्रंथ एकनाथांनी लिहून समाप्त केला. गुरुकृपेने परमेश्वरी साक्षात्कार झाल्यानंतर त्यांनी एकूण सात वर्षे तीर्थयात्रेत घालवली. गुरूंबरोबर तीर्थयात्रा पूर्ण केल्यावर त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला. संत एकनाथ अद्वितीय होते कारण त्यांनी वेदांत आणि सूफीवाद यांचे मिश्रण केले. एकनाथ एक धर्माभिमानी गुरुभक्त होते आणि त्यांनी एक-जनार्दन नावाने अभंग लिहिले.

# महाराष्ट्रात महाविकास आघाडी आता नावालाच



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात महाविकास आघाडी आता नावालाच उरली आहे. कारण, भारत जोडो यात्रेत राष्ट्रवादी, शिवसेनेच्या नेतृत्वाचा अपमान झाला असून एका अर्थाने काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची खेळी यशस्वी ठरली आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली निघालेल्या भारत जोडो यात्रेचा 14 दिवसांचा महाराष्ट्रातला प्रवास काल संपला. नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, शेगाव, बुलढाणा, जळगाव आदी जिल्ह्यातून यात्रेचा प्रवास झाला. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्ष महाविकास आघाडी सोबत असुन राष्ट्रवादी आणि शिवसेना पक्ष सोबत आहेत.**

यात्रेत सहयोगी पक्षाच्या नेतृत्वाने सहभागी व्हावे अशी पुर्वरचना काँग्रेसकडून करण्यात आली. त्यानुसार सुप्रियाताई सुळे, रोहित पवार, आदित्य ठाकरे, एकनाथ खडसे, राजेश टोपे आदी मंडळी यात्रे दरम्यान पायपीट करण्यात सहभागी झाली. शेगाव तथा अन्य मुख्यालय ठिकाणी राहुल गांधींच्या जाहिर सभा झाल्या. यातून एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी निश्चित म्हणावी लागेल. संयोजक अर्थात प्रदेश अध्यक्ष नाना पटोलेंनी राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या कुठल्याही नेत्यांना जाहिर सभेत बोलण्याची संधी दिली नाही. शेगावात एकनाथ खडसे सारखे जेष्ठ नेते असताना त्यांनाही बोलू दिलं नाही. राजकियदृष्ट्या हा काँग्रेसनं सहकारी पक्षाचा केलेला अपमानच म्हणावा लागेल. आ.नानाभाऊ पटोले आणि राष्ट्रवादी पक्ष नेतृत्वात धुसफुस नेहमीच चालते. त्याचाच एक भाग म्हणुन त्यांची जागा त्यांना दाखवुन देण्यात पटोले यशस्वी झाले असं म्हणायला हरकत नाही. पदयात्रेचा समारोप काल बुलढाणा जिल्ह्यात राहुल गांधींच्या जाहिर सभेने झाला. महाराष्ट्रात चौदा दिवसांचा प्रवास करताना यात्रा यशस्वी वाटत असली तरी त्यातुन राजकिय चमत्कार आणि घडामोडी निश्चित पहायला मिळाल्या. एक तर राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जाहिर अपमान करून जनतेचा रोष ओढावून घेतला. एका भाषणात यात्रेचे चौदा दिवस गोदावरी पात्रात बुडाल्यासारखे निश्चित झाले म्हणावे लागतील. भलेही त्यांनी दुसऱ्या सभेत चुक सुधारून घेतली. पण राहुल गांधी यांच्या मनात सावरकरांविषयी असलेली घृणा अधुनमधुन सतत बाहेर पडत असते आणि त्यांच्याच जन्मभुमीत अर्थात महाराष्ट्रात येवुन सुद्धा म्हणे सावरकरांनी इंग्रजांची माफी मागितली. त्यानंतर गदारोळ उठला. हिंदु भक्त, राष्ट्र भक्त रस्त्यावर उतरले. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे वाशिमच्या जाहिर सभेत भारताचं राष्ट्रगीत चालु करताना नेपाळचे लागलेले राष्ट्रगीत लोकांना सहन झाले नाही.खरं तर जाणिवपुर्वक खोडसाळपणाच म्हणावा लागेल. कारण, आपल्या देशात दुसऱ्या देशाचे राष्ट्रगीत लागण्याची चुक यापुर्वी कधीच झालेली नाही. यातुन राष्ट्रभक्ती आणि देशावर असलेले प्रेम किती नाटकं म्हणावे लागेल ? याची प्रचिती लोकांना आली. यात्रेदरम्यान वेगवेगळे प्रयोग राहुल गांधींनी निश्चित केले. जिथे काँग्रेस बालेकिल्ला राज्यात आहे त्याच भागातुन भारत जोडो यात्रा अगदी रचना काढून निघाली. नांदेड किंवा विदर्भात काँग्रेस बालेकिल्ले म्हणुन ओळखल्या जाते. कदाचित पश्चिम महाराष्ट्रात यात्रा आली असती तर प्रतिसाद मिळाला नसता ? दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे भारत जोडो यात्रेत महाविकास आघाडीत सहभागी असलेल्या राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या नेतृत्वाने सहभागी व्हावं आणि महाविकास आघाडी किती भक्कम आहे ? हे दाखवण्यासाठी राज्यात यात्रा येण्याच्या अगोदर काँग्रेसच्या अनेक पुढाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले होते. शरदचंद्रजी पवार, उद्धवजी ठाकरे यांना भेटून यात्रेचे निमंत्रण दिले होते. पवार साहेबांनी कुठेतरी सहभागी व्हावे असा निखारीचा प्रयत्न झाला. पण यात्रेत कुठेही पवार - ठाकरेंनी सहभाग दाखवला नाही. त्याची कारणे वेगवेगळी असली तरी दया, कुछ तो गडबड है यात शंका नाही. पवार साहेब आजारी असल्याचे कारण, समजून घेवू पण, उद्धव ठाकरेंनी देखील दुर राहणे पसंत केले. त्याचा अर्थ असा निघू शकतो भविष्यात



काँग्रेसला बाजुला ठेवुन राजकारणात राष्ट्रवादी आणि शिवसेना एकत्र येवू शकते. पवार- ठाकरे सहभागी झाले नसले तरी त्यांनी आपले वारसदार आदित्य ठाकरे तथा रोहित पवारांना पाठवले. हे बिचारे लेकरे यात्रेत सहभागी झाले. राहुल गांधींच्या सोबत चालताना माध्यमांवर चमकले. काही काळ सुप्रियाताई देखील सहभागी झाल्या. गंमत बघा, सुप्रियाताई या तर पक्षाच्या जेष्ठ नेत्या म्हणुन त्यांच्याकडे पाहिल्या जाते. पण भारत जोडो यात्रेत या मंडळींना जाहीर भाषणात कुठेही संधी दिली नाही. किमान सुप्रियाताईंना एखादी संधी द्यायला हवी होती. पण, अगदी संयोजकांनी कट मारत त्यांची जागा त्यांना दाखवून दिली. शेगावच्या जाहीर सभेसाठी राष्ट्रवादी पक्षाचे जेष्ठ नेते एकनाथ खडसे प्रवास करून जळगावहुन आले. बिचाऱ्यांना तोंड उघडायला संधी दिली नाही. तिथे राजेश टोपे, फौजिया खान, अरूण गुजराथी, शिवसेनेचे काही प्रमुख नेते असताना एकालाही बोलण्याची संधी देण्यात आली नाही. प्रश्न असा पडतो चौदा दिवसांच्या भारत जोडो यात्रेत प्रदेश काँग्रेसने त्यांच्या अजिंड्याशिवाय इतरांना शिरकाव होवू दिला नाही. कशामुळे बोलु दिले नाही ?त्यापेक्षा निमंत्रण देवून बोलायला संधी न देणं म्हणजे जेवणाचं आमंत्रण द्यायचं, आणि पंक्तीला बसल्यास ताटात काही वाढायचं नाही असंच काही म्हणावे लागेल. यावर बारकाईने नजर टाकुन राजकिय संशोधन करण्याचा प्रयत्न केला तर यात्रेवर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची पुर्णतः कमांड होती. खरं तर पटोले हे भाजप मधून आले त्या अगोदर बाळासाहेब थोरात, अशोकराव चव्हाण, पृथ्विराज चव्हाण यांचे आयुष्य महाराष्ट्र काँग्रेस मध्ये गेले. पण, आपल्याच नेतृत्वाचा प्रभाव पटोलेंनी दाखवताना यात्रा आपल्या ताब्यात विशेषतः आपण सुचवेल तेच राहुल गांधी ऐकणार, राजकियदृष्ट्या हे गणित जुळवुन त्यांनी ठेवलं असावं. एव्हाना तसंच घडलं. राहुल गांधींच्या आसपास दुसऱ्यांना लक्ष्मणरेषा ओढुन ठेवल्यासारखी पटोलेंची भुमिका होती. एकट्या राहुल गांधींना बाजुला सोडलच नाही. त्यामुळे पटोले प्रभावित यात्रा मग कार्यक्रमाची रचना. त्यातूनच सहयोगी राष्ट्रवादी आणि शिवसेना नेत्यांचा झालेला अपमान हे रहस्य आता चर्चेला येवु शकते. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे काँग्रेसचे हे राजकारण स्वतः शरदचंद्र पवार अनेक वर्षांपासुन ओळखुन आहेत. आपण सहभागी झालोत तर पायपीट करूनच परत यावे लागेल. राहुल गांधी बोलायला संधी देणार नाहीत. कदाचित हे सारं ओळखून शरदचंद्र पवारांनी यात्रेत सहभाग दाखवला नाही. उद्धव ठाकरे मनाने काँग्रेस सोबत नाहीत. त्याहून अधिक बारामतीकरांच्या गळ्यात जास्त पडलेले आहेतच. स्वतःहून यात्रेत न जाण्याचा त्यांचा निर्णय अखेर ठाम राहिला. आक्षेप येवू नये म्हणुन लेकराला पाठवले. पण, अन्य शिवसैनिक कुणीही यात्रेत सहभागी झाला नाही. चौदा दिवसांची भारत जोडो यात्रा यशस्वी ठरली असे काँग्रेसजनांना निश्चित वाटत असेल. मोठ्या थाटामाटात विदर्भातून काल राहुल गांधीला यात्रेचा समारोप करून निरोप दिला असला तरी यात्रा दरम्यान पाण्याच्या लाटा पुलाखालुन निश्चित वाहुन गेल्या. ज्याचा राजकिय उद्रेक येणाऱ्या काळात झालेला दिसेल. कदाचित निवडणुकीत एकटा काँग्रेस महाविकास आघाडीतून बाहेर पडला तर नवल वाटणार नाही. कारण, भारत जोडो यात्रेत सहयोगी पक्षाच्या उदळलेल्या दांड्या आणि त्यांना दाखवून दिलेली त्यांची जागा राजकियदृष्ट्या हा फार मोठा अपमान म्हणावा लागेल आणि या सर्व घडामोडीत प्रदेशाध्यक्ष आ.नानाभाऊ पटोले यांच्या राजकिय खेळी यशस्वी झाल्या. त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी. स्वपक्षातील अनेकांना यात्रेपासून दुर ठेवण्यात ते यशस्वी तर झालेच पण, खा.शरदचंद्रजी पवार आणि ठाकरे यांचाही राजकीय पाय पुढे पडू दिला नाही.

# अवघी शिक्षण व्यवस्थाच कुजू घातल्या देशाची वाटचाल आज उद्या अराजकतेकडेच होणार !

आधुनिक केसरी

**आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षे होत आहेत. आपला देश आज सर्व क्षेत्रात स्वावलंबी असायला हवा होता परंतू होत उलटंच चाललं आहे. आपण पुन्हा परत भांडलशाहांच्या, वसाहतवादींच्या, शोषणकर्त्यांच्या, जातीवाद्यांच्या, धार्मिकतेच्या आणि अर्थातच हुकुमशहांच्या ताब्यात जातो आहोत. सत्तेचं आणि त्यायोगे येणा-या अनैतिक पैशाचं ध्रुविकरण होत चाललं आहे आणि डोळ्यादेकत आपण पारतंत्र्याकडं वाटचाल करतो आहोत, हे दिसताहे.**

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : 3

काय आवस्था करुन ठेवली आहे शिक्षण व्यवस्थेची ? कुठलं शिक्षण आता सर्वांसाठी खुलं आहे ? कोणत्या शाखा भरभराटीस आल्या आहेत ? किती वाढलं आहे खाजगीकरण ? किती वर्षांनी देताहे सरकार शिक्षण संस्थांना अनुदान ? का उघडली जात आहेत इंग्रजी माध्यमांची शिक्षण व्यवस्था ? कोण शिकत आहेत तिथं आणि कोण आहेत शिकवायला ? कशासाठी तीन तीन वर्षाचा शिक्षण सेवक कालावधी ? किती दिवस काढायचं आयुष्य सिएचबीवर ? सरकारी अनुदानीत मराठी माध्यमांच्या शाळा कोण बंद पाडंत आहेत? कोण खतपाणी घालत आहेत कोचिंग क्लास कल्चरला? कुणाचे लेकरं आहेत इंग्रजी माध्यमांनी, गुणवत्ता आहे का तिथं ? कुणाला परवडतं हे शिक्षण ? मुक्त विद्यापिठांनी मांडलेली दुकानदारी कोणासाठी आहे आणि कोण भरडले जात आहेत ? कसलं जनरेशन निर्माण करत आहोत आपण ? का दर वर्षी कार्यकर्त्यांनी खैराती वाटाव्यात तशा वाटल्या जात आहेत शिक्षण संस्था ? कोण होत आहेत गडगंज आणि कोण लागलेत भिकेला ? कुठला डिगरीधारी स्वाभीमानी उरला आहे आणि कसली लाचारी पेरत सुटलं आहे शिक्षण या देशातल्या नवजात शिशूंच्या नसानसात? कोंडवाड्यांनी कोंडून टाकावेत लेकरं अशी झाली आहे शाळांची गत आणि गुणवत्तेची महाविद्यालये पडत चालली आहेत ओसाड ? कसल्या घेतल्या जात आहेत परीक्षा आणि कोण लिहितो आहे पेपर बोर्डांवर ? काय उरलंय काय शिक्षणात म्हनून दहावी नंतरच शाळा सोडून देणारे किती आणि मोलमजूरी करुन वर्षभर एकही तासिका न करता परीक्षा पास होणारे किती? कशासाठी बांधलीत ग्रंथालये आणि कोण वाचतो आहे पुस्तके? परीक्षेच्या आदल्या दिवशींची गाईड्स आणि नोट्सची विक्री लक्षणीय आहे. ऑनलाईन शिक्षण आणि परीक्षांनी तर चक्क माती करुन टाकली आहे शिक्षणाची, काय चाललंय डोनेशन शाळा महाविद्यालयात प्रवेशासाठी करांच्या काय आहेत आपल्या शाळा-महाविद्यालयांचे आभ्यासक्रम ? इमारतींचे सांगाडे गेले गगनावर आणि शिक्षणाची डोळ्यादकत माती झाली त्याचं कसं मायबाप ? कर्ज काढून लेकरं शिकवणारे माय-बापं पार खंगून गेलेत आणि उध्वस्त झाले आहेत विज्ञान शाखेतून लेकरं शिकवणारे कुटुंबच्या कुटुंबं. कसलं गणगोत नेमलं आहे शिक्षक, प्राध्यापक म्हणून आणि म्हणूनच नाहीत का चालले लेकरं बाहेर कोचिंग क्लासेसला ? काय उलाढाल आहे, कधी कल्पना करुन पाहिली या क्लासेसची ? कसले नागरीक निर्माण करत आहोत आपण, ज्यांना शारिरीक श्रम हीन दर्जाचं वाटताहे आणि बौद्धीक कुवतही कमावली नाही ज्यांनी, कुठलंच गंभीर कार्य नाही पार पाडता येत यांना.कसला रकुंदळ मांडून ठेवलाय शिक्षण क्षेत्राचा आपण ? रात्रंदिवस चक्कीत भरडून काढले जात आहेत लेकरं एकीकडं आणि एकीकडं काय शिक्षण असतं याची खबरही नाही पालकांना ? कार धसकटं उरावर बसंत चालले आहेत समाजाचे नेते म्हणून गावोगावी आणि सभ्यता पार मान मोडून पडली आहे कोप-यात. तो, जो झिजून गेला शिक्षणातले बारकावे शिकण्यात, त्याला कसलीच नौकरी नाही आणि ते जे गुंड, मवाली करणारं गाबरु, करत आहे नेतृत्व देशाच्या ग्रामपंचायतीं पासून ते खासदारकीपर्यंतच्या सभागृहांचं.कसे जगणार आहोत आपण आज, उद्या, हा नगदीच प्रश्न पडला आहे आपल्या समोर. कशी टिकणार आहे लोकशाही अशा असुरक्षीत हातात, मोठा गंभीर प्रश्न आहे. सगळे विद्वान शिक्षक,-प्राध्यापक, त्यागी, तपस्वी समाजसुधारक, सामाजिक विचारवंत, कुशाग्रबुद्धीमत्तेचे शास्त्रज्ञ, संवेदनशील



कवी-लेखक, कायदेतज्ञ आणि तमाम विवेकी लोक जे देशाच्या प्रगतीकडं आ-वासून बसले आहेत, त्यांनाच संपवून आपण कुणाच्या मागं मागं चाललो आहोत, कांहीच कळायला मार्ग नाही. या देशात जात, धर्म, वर्ण, वर्ग आणि साम्राज्यवादी व्यवस्थांनी सगळ्या शिखर संस्था ताब्यात घेतल्या आहेत आणि निःसंशय विकारांच बिजारोपण सुरु आहे. प्रेम, आपुलकी, जिव्हाळा, मैत्रभाव, त्याग, समर्पण, आहूती, अहिंसा,करुणा या श्रद्धेय शब्दांवरुन विश्वास उडवला आहे या अराजक अमानुषांनी आपला. हे सगळे षडरिपूग्रस्त नालायक लोक देश कुरतडून खात आहेत आणि आपण भकास डोळ्यांनी हे नागडं वास्तव पहात आहोत. कधी काळी परकियांनी आपल्याला पारतंत्र्यात ठेवलं होतं, आपलं शोषण केलं होतं आणि आता आपल्याच माणसांची शोषण साखळी ध्या दिवसा आपली पिळवनूक करते आहे.आपलेच दात आणि आपलेच ओठ म्हणून मूग गिळून गप्प बसत राहिलो आहोत आपण.तोंड उघडलं तर गोळी कुठल्या दिशेने येईल याची शास्वती नाही. हा तोंड दाबून बुक्यांचा मार आपण खात चाललो आहोत.

**इंग्रज तर लावले परतावून...**

आता कुणाविरुद्ध ठोकायची बोंब ?
हेच तर आपले सामुहीक दुर्दैव आहे सज्जनांनो ! विवेकाला मारुन टाकणारे जात-धर्म अंधश्रदधांनाच खत-पाणी घालनार. सारासार विचार करु शकणारी कुठल्याही यंत्रणेची मुळं रुजूच दिली जाणार नाहीत.केवळ उदो उदो करणारी लाचार अर्धमेली पोटं हाताळून सत्ता टिकवू पाहणारी मानसिकता कधीही घातंकच.सरळ जुवाला मान देणारी गुरंढोरं तयार करु पाहणारी शिक्षणव्यवस्था ना स्वाभिमानी नेतृत्व उभं राहू देते ना कसलं आंदोलन उभं राहू देते.अवघी शिक्षण व्यवस्थाच कुजू घातल्या देशाची वाटचाल आज उद्या अराजकतेकडेच होणार !( लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी साहित्याचे संशोधन मार्गदर्शक आहेत.)

# दिवा



रंजना सानप
मो. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी

**तिन्हीसांजेला तिनं देवापुढे दिवा लावला. त्या दिव्याकडे ती एकटक पाहत राहिली. विजेच्या लखलखाटात त्याचा उजेड इवलासा वाटत होता. पण तिला तो उजेड खोल मनातल्या गाभाऱ्यात घेऊन जात होता. तो नऊवारीचा पदर सावरत ती हळूच भिंतीला टेकून बसली. पहिल्या वर्गात शिकणाऱ्या नातीला तिने हाक मारली. "मिनू बाळा आत ये. शुभोकरोती म्हणून घे." ती बाहेरूनच हो म्हणाली, सगळीकडे अंधार पडला. पण मिणमिणत्या दिव्याच्या प्रकाश खोलीभर पसरला. अचानकच लाईट गेली.**

तसा तिच्या आतल्या अंधाऱ्या खोलीतही उजेड पडल्यावाणी झाले. तीचं मन भूतकाळात खूप लांब लांब गेलं.

त्या काळी पालापाचोळ्याच्या झोपडयात एकच दिवा जळत असायचा. त्या दिव्याला पुरेसं तेलही नसायचं.तेल संपल म्हणून दिव्याच्या उजेडात आई लगबगीने स्वयंपाक उरकून घ्यायची. जेवणं उरकली की झोपडयाबाहेर जाऊन बसायची. टिपूर चांदण्याचा उजेड तिला खूप बरा वाटायचा. दिवसभर काबाडकष्ट करून थकल्या भागल्या जीवाला थोडा विसावा मिळायचा. ती स्वतःला त्या उजेडात शोधायची. असं चांदणं संसारात कायमचं पडावं. न विझणारा दिवा माझ्याबी झोपडयात लागावा असं तिला सारखं वाटायचं. पण हे दुःख दारिद्र्य मुलं शिकल्याशिवाय दूर होणार नाही हे तिला माहीत होतं.आयुष्यातला अंधार हटवण्यासाठी ती गाव सोडून कित्येक मैल लांब आली होती.ऊसावर कोयता चालवता चालवता ती तिचं सपान मोळ्या मोळ्यानं बांधत होती.

कंदिलाच्या उजेडात दिवस उगवायच्या आधीच तिचा बाप ऊस तोडायला झोपड्याबाहेर पडायचा.कंदील पुसून रात्रीच तयारी करुन ठेवावी लागायची. ती गुळगुळीत काच पुसताना काळजी घ्यावी लागायची. पण लहान हातानेच आतली काजळी नीट पुसली जायची आणि कंदील पेटवताच लख्ख उजेड पडायचा. कधी रात्रभर कंदील चालू राहिला की नाकात काजळी साठायची.त्या कंदिलाच्या उजेडातच बरंच काही शिकणं व्हायचं.जगण्याचं सुत्रच जणू तो शिकवत जायचा. त्याच्या उजेडात जवळ बसण्यासाठी भावंडांची भांडणे लागायची.

"उजेडात बसण्यासाठी भांडताय तसा कामाचाही उजेड पडू दे असं काहीतरी आई बोलून जायची. तेंव्हा त्याचा अर्थ उमगायचा नाही.तेव्हा अंधारातही बाप पालापाचोळ्यातून चालताना कधीच घाबरला नाही. पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्येक पाऊल धाडसाने टाकत गेला. "किती मोठं किरडू पायाजवळून गेलं. फणा काढून नागोबा पुढच उभा होता.मी त्याला म्हणालो तू तूझ्या वाटेनं जा मी माझ्या वाटेनं. ते त्याच्या जीवाला घाबरत होतं आणि मी माझ्या जीवाला". त्या वयात हे ऐकताना भीती आणि नवल दोन्ही वाटायचं.



अंधारात लांबून येणारा उजेड दिसला की कोणी येत असल्याची चाहूल लागायची.कोण बरं असलं. येणाऱ्या आकृतीच्या आकारावरून तर्क लावले जायचे. एक छोटा दिवाही घरात जळत असायचा .त्याला चिमणी म्हणायचे. त्यात रॉकेल भरताना एक वेगळाच वास यायचा. हळूहळू विझताना नजर त्यावर रोखली जायची.तो विझुच नये असं वाटायचं. "अगं तेल संपलं की विझणारच की, असं आई बोलून जायची." तसंच काहीसं मानवी आयुष्य. आयुष्याच्या संध्याकाळी दिवा विझणारच हे वास्तव स्वीकारायला मन तयारच होत नाही.

हे ती अनुभवाने शिकत गेली. आईबापाने ज्ञानाचा दिवा झोपड्यात लावला. लेकरं कष्टातनं उभी केली. आता मोठ्या घरात विजेचा दिवा लागला.

कालानुरूप बदल झाला.ती सासरी गेली. तिलाही वाटेत चालताना अनेक खाचखळगे लागले. पण एक वेगळ्या विचारांचा दिवा तिने मनात पेटता ठेवला होता. त्या जिद्दीवरच ती रस्ता तुडवत राहिली. आणि तिला प्रकाशाची वाट सापडली. तिच्या कामाने घर तर उजळले त्याबरोबर अनेक अंधाऱ्या कोपऱ्यातही आपल्या ज्ञान दानातून नवं विचारांची मशाल तिनं पेटवली. जी अनेकांना सोबत घेऊन जाते आहे.

आयुष्याच्या संध्याकाळीही तो नंदादीप तिची सोबत करतो आहे. तिचं एकटेपण घालवतो आहे. त्याच्याकडे पाहतच तिला समाधी लागते आहे. तो तिच्यापुढे जगण्याचं सार खोलतो आहे.तुझी प्राणज्योत कधीही मावळेल पण तू दिवा होऊन जा असं तिला सांगतो आहे.

# आभासी जगात झालेला गोंधळ हुश्श...



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**बाई खूप दमले. आज किती कामे होती. किती बरे झाले असते नई जर ह्यांनी माझी कामे केली असती, आणि मी ह्यांची. ह्या विचारातच तंद्री केव्हा लागली कळलेच नाही. थोड्या वेळानंतर.....आवाज कानी पडला, "आई उठ उठ अगं जायचे आहे ना कंपनीत कामाला?" मी उठले पण बघते तर काय अहो घरातल्या कामात गुंग होते. आणि माझी मुलगी मला कामाला जाण्यासाठी सांगत होती. का नेमके चालले आहे ह्या गोंधळातच मी ऑफिसला जाण्यासाठी तयार झाले.**

तयार झाले खरी पण ऑफिसला जायचे कसे? ह्यांची HERO HONDA तर चालवताच येत नाही.परंतु माझ्या मनात चाललेला गोंधळाबरोबरचं वेळेचे गणित ही सोडवायच होत. वेळ थांबत नव्हती.मग काय निघाले धावत पळत.अखेर पोहचले, पण तेवढ्यात MRS. SHINDE ताईंचा आवाज आला.आणि त्या मला म्हणाल्या ,"आलात का ताई,चला कामाला लागू". पण तुम्ही येथे ? मी म्हणाले. मग MRS. SHINDE TAI माझ्याकडे बघायला लागल्या आणि म्हणाल्या,"अहो असे काय म्हणता ताई आपण काम करायला आलो ना येथे चला काम करु मग." मीही मान डोलावली आणि निघाले त्यांच्यासोबत कामाला. कामाला गेलो खरे दोघीपण पण काय काम करायचे आहे हेच काही कळेना. SHINDE ताई मला म्हणाल्या हे कसे करायचे आहे हो मला काही कळेना. मग मीही त्यांना म्हणाले मलाही काही कळेना. आम्ही दोघी गोंधळात आणि त्यात पाटील आणि जगताप वहिनी त्यांचा गोंधळ आम्हाला सांगू लागल्या. मग आम्ही सरळ कंपनीच्या मालकीन बाईंना फोन केला आणि त्यांना तातडीने कंपनीत बोलावले. त्या आल्यानंतर आम्हा सर्वांच्या गोंधळाची ट्रेन इतकी सुटली होती की ती थांबेनाच. पण काही क्षणातच आमच्या अपेक्षांचा भंग झाला कारण खुद्द मालकीणबाईच म्हणाल्या की मलाच काही कळेना तुम्ही आज सुट्टी घ्या सर्व जणींनी. मग काय आले घरी सगळ्या गोंधळाने खूप दमलेली होती. ह्यांना मी म्हणाले थोडा चहा मिळेल का? तेवढ्यात खिडकीतून एक नजर बाहेर पडली. तर शेजारच्या आजी त्या नातवाला चिमणी कावळ्याची गोष्ट सांगत होत्या. तिथेही तेच चिमणी चिमणी दार उघड दार उघड ऐवजी कावळ्या कावळ्या दार उघड असे चालले होते. तेवढ्यात आमच्या अहोंनी चहाचा कप आणून माझ्या जवळ ठेवला. म्हणलं चला निदान आज चहा तरी पिऊन घेऊ. पण कशाचे काय तो चहाच मुळी नव्हता. मग मी यांना म्हणाले ,"अहो तुम्ही चहा कसा बनवला". तर हे मला म्हणाले ,"चिमूटभर साखर आणि दोन चमचे चहा पावडर टाकली". तेवढ्यात मी कपाळावर हात मारून घेतला. तेवढ्यात हे मला म्हणाले," बर तू बाहेर जाणार असशील तर घरातलं वाण सामान संपले आहे ते घेऊन ये". मग मी निघाले सामान आणायला बाहेर. पण आज दुकानात भयानक गर्दी होती. प्रत्येक जण आपल्याला हवे ते सामान स्वतःहूनच घेत होते. मग त्या गर्दीत मी ही शिरले. बघते तर दुकानाचे मालक सुद्धा त्या गर्दीत होते. मग मी त्यांना म्हणाले, "काय हो काका तुम्ही इथे काय करताय! अहो मला सामान घ्यायचे आहे तेवढे द्या की". मग तेवढ्यात ते मला म्हणाले," अगं मी CUSTOMER आहे मी कसे तुला सामान देणार". पण मला प्रश्न पडला मी तरी कसे सामान घेणार. पण बाकी घेत आहेत मग मीही माझे माझे सामान घेतले आणि निघाले.



तेवढ्यात शेजारच्या पार्लर मध्ये लक्ष गेले. तेथे CUSTOMER चं दुकानदाराचे केस कटिंग करत होते. कटिंग करत होते. आणि चालत चालत रस्त्यावरून निघाले होते.

एवढ्यात कानी एक आवाज आला ""चोर ,चोर पकडा त्याला". माझेही लक्ष त्या आवाजाकडे गेले पण बघते तर काय पोलिसाच्या मागे चोर लागला आहे. आणि मग काय माझ्या गोंधळात आणखी एक गोंधळाची भर. पण म्हणलं जाऊ दे मुलांना निदान शाळेतून घेऊन येऊयात. शाळेत गेले तर बघते तर काय शाळा तर सुटलीच नव्हती. मग मी गेले एका वर्गात तेथे माझीच छोटी मुलगी तिच्याच शिक्षकांना शिकवत होती. अरे देवा! आणखी एक गोंधळ असे म्हणत मी तिला म्हणाले ,"अगं शाळा सुटली की आता चल घरी". असे म्हणत मुलांना घरी सोडले व सामानही घरी ठेवले. आणि पहिली डॉक्टरांकडे गेले डोकेदुखीची गोळी घ्यायला. पण लक्षातच नाही आले की या गोंधळाच्या जगात डॉक्टरांकडे गेल्यावर ही गोंधळ उडेल.स्वतः डॉक्टरांनी गोळी देण्याऐवजी मलाच प्रश्न विचारू लागले की मी डॉक्टर आहे का?

अरे बापरे नको नको काय चाललेय हे...

झालं ह्या गोंधळाची एक कमी होती असे म्हणत घरी आले.अरे बापरे काय चाललेय हे, गोळी घेण्यापेक्षा थोडा वेळ आराम करावा.

आई आई...उठ ना ग,

घट्ट मिटलेल्या पापण्यांच्या नकळत एक डोळा उघडून पाहिले. भोवताली मु लं आणि अहो बाजूला उभे...ताडकन उठून बसले. काय ग काय झालं, तेव्हा हे म्हणाले ,"अगं आज तुझ्या कामाला सुट्टी, थोडा आराम कर. मी आज कामे करतो". झालेला सगळा गोंधळ माझ्या आता लक्षात आला की मी जो गोंधळ पाहत होते तो स्वप्नात. पण झालेल्या गोंधळाने मी इतकी चक्रावले होते की मी ह्यांना म्हणाले," अहो, नको नको असू द्या मी करते सर्व. पुन्हा कधी कामाची अदलाबदल नको.

नावांचा आडनाव चा केवळ एक योगायोग आहे. काही योग्य अयोग्य असेल तर केवळ एक योगायोग आहे. यातून कुणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नाही.

# काळाच्या ओघात टेलिव्हिजन मागे पडले !

आधुनिक केसरी

२१नोव्हेंबर १९६६ मध्ये संयुक्त राष्ट्राकडून सर्वात प्रथम टेलिव्हिजन फोरम बोलावण्यात आली.यामध्ये जगभरातील या इंडस्ट्रीमधील प्रमुख लोक सहभागी झाले.व यात महत्वपूर्ण निर्णय घेतला गेला.दिवसागणिक टिव्ही चे महत्व वाढु लागले त्यामुळे २१नोव्हेंबर रोजी जागतिक टेलिव्हिजन दिन म्हणून घोषित करण्यात आला.

आपल्याकडे टिव्ही हा लोकांच्या जीवनातील अविभाज्य घटक आहे.एक काळ असा होता की आपल्याला टिव्ही शिवाय करमतच नव्हते.लोकांशी जोडले जाण्याचे हे प्रभावी माध्यम आहे. लोकांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडवून आणण्यात टिव्हीचा वाटा मोलाचा होता.पुर्वी दुरदर्शन शासकीय वाहीनी मोफत होती. टेलिव्हिजन क्षेत्रात खासगिकरण आले .टिव्ही वाहीन्यांच्या संख्या झपाट्याने वाढल्या . प्रत्येक विषयाची ,प्रत्येक भाषेमध्ये वाहीन्या सुरू झाल्या.त्यामुळे फुकट बघायला मिळणारे चॅनेल विकत घेऊन बघावे लागत आहे.चॅनेलची भाऊगर्दी वाढल्याने कोणता चॅनेल बघू आणि कोणता नाही असा प्रश्न पडला आहे.



यातही अधुन मधुन जाहीरांताचा मारा चालुच असतो.त्यामुळे लोक या टिव्हीला कंटाळले. टेलिव्हिजनच्या माध्यमातून सर्वच क्षेत्रातील ज्ञान मिळत असते.युनोस्कोने टेलिव्हिजनला संप्रेषण आणि माहीतीचा भाग म्हणून ओळखले जाते.आज टेलिव्हिजनच्या क्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे.कारण सोशल मिडियाच्या जमान्यात टिव्ही चे महत्व कमी होत चालले आहे. पुर्वी कृष्णधवल टिव्ही होता नंतर रंगित टिव्ही आले. आणि आता एलसिडी,एलईडी टिव्ही आले काळानुरूप यात बदल होत गेले. परंतू लोकांना काय हवंय काय नाही हे वाहीन्यांनी ओळखले पाहिजे. १९८७ते १९८८काळात रामायण मालिका प्रसारित व्हॉयची लोकांना अक्षरशः भुरळ पाडली.ही मालिका पाहताना रस्ते ओस पडायचे .मात्र आता तशी परीस्थिती राहेलेली नाही. लोकांचा टिव्हिबद्दलचा जिव्हाळा कमी होत चालला आहे.पुर्वी दुरदर्शनवर सातच्या बातम्या लोक आवर्जून बघायचे .आताच्या वाहीन्यांच्या बातम्यांमध्ये लोकांना रस राहीला नाही.आवड कमी होऊ लागली. घरोघरी मोबाईल ,संगणक आले ,सोशल मिडीयाचा प्रभाव लोकांवर पडत चालला. त्यामुळे टिव्हीचे महत्व कमी होऊ लागले. ग्रामीण भागात मोफत वाहीन्यांचे चॅनेल पाहीले जातात असं चित्र दिसत आहे.पुर्वी फुकट होते.चॅनेल मोजकेच होते. आता स्पर्धा वाढली चॅनेलची संख्या वाढली .रिचार्ज मारल्याशिवाय टिव्ही पाहताच येत नाही . त्यामुळे सर्वसामान्यांन झळ बसू लागली त्यामुळे मोफत टिव्ही वाहीन्यांचा कल वाढू लागला .परंतू आज सोशल मिडियाच्या जमान्यात टेलिव्हिजनचे महत्व अबाधित ठेवण्यासाठी सवलतीच्या दरात चॅनेल उपलब्ध झाले पाहिजे.तर लोक याकडे वळतील. सध्या टेलिव्हिजनची जागा मोबाईलने घेतली आहे . टेलिव्हिजनचे लोकांच्या जीवनातील योगदान विसरता येणार नाही.परंतू टेलिव्हिजन नामशेष होईल की काय असा प्रश्न पडला आहे.

संतोष दत्तू शिंदे,मो. ७९७२७४५०२५

# गांज्याची वाहतूक करणारा गुन्हे शाखेच्या जाळ्यात

## पाच लाख पंधरा हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूरकडून धुळ्यात गांजा वाहतूक करत असताना धुळे एल.सी.बी ने आरोपीच्या आवळल्या मुसक्या सव्वा लाखाच्या गांजा सहित चार लाखाची स्विफ्ट कार जप्त केली. धुळे शहरातील पोलीस निरीक्षक श्री हेमंत पाटील यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाल्याने मुंबई आग्रा महामार्गावरून वाहन क्र . एम . एच . १६ सी . क्यू . ३६६३ या वाहनातून आरोपी आनंद गणेश आरडे रा . अहमदनगर हा गांजा नावाचा मानवी मेंदूवर विपरीत परिणाम घडवून आणणारा मादक पदार्थ सोबत बाळगुन विक्री करण्याचे उद्येशाने शिरपुर कडुन धुळे कडे येत आहे अशी खात्रीशीर माहिती प्राप्त झाली. सदर बाहनाचा शोध घेवून नमुद बातमीची खात्री करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करणे बाबत पो.नि. हेमंत पाटील यांनी पोसई प्रकाश पाटील व स्थानिक गुन्हे शाखेकडील पथकास आदेशीत केले.प्रकाश पाटील यांनी त्यांच्या पथकासह मुंबई आग्रा महामार्गा वरील सोनगीर गावाजवळील हॉटेल महाखेतेश्वर राजस्थानी ढाच्यासमोर दिनांक १ ९ / १ / २०२२ रोजी सापळा रचला असता मिळालेल्या बातमी प्रमाणे स्विफ्ट कार क्रमांक एम . एच . १६ सी.क्यू . ३६६३ हे वाहन शिरपुर कडुन धुळे शहराकडे येतांना दिसल्याने त्यास थांबवून सदर स्विफट कारची तपासणी केली असता सदर कारमध्ये इसम नामे आनंद गणेश आरडे वय - मजुरी रा बोरडगाव रोड, भोसले आखाडा, मच्छिन्द्रनाथ कॉलनी जवळ ता.जि. अहमदनगर याचे कब्न्यात खालील नमुद किमतीचा व वर्णनाचा गांजा मिळून आला वाजेच्या सुमारास २७ व्यवसाय अ.क्र . किंमत वर्णन १ ) १,१५,००० / - रु.किमतीचा एका पाहन्या रंगाच्या गोणी मध्ये गांजा सदृश्य हिरवट पिवळसर रंगाचा अर्धवट ओलसर



व सुकलेला पाने , बिया , काडया असलेला उग्र वासाचा पदार्थ १४ किलो ३७५ ग्रॅम वजनाचा २ ) ४,००,००० / रु.कि.ची एक लाल रंगाची स्विफ्ट कार एकुण ५,१५,००० / - रु . किमतीचा मुद्येमाल वरील प्रमाणे मिळून आलेला मुद्येमाल जप्त करुन आनंद गणेश आरडे याचे विरुध्द पोकी / मथुर किशोर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन सोनगीर पोलीस ठाणे येथे एन.डी.पी.एस ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे . सदरची कारवाई संजय बारकुंड , पोलीस अधीक्षक, किशोर काळे , अपर पोलीस अधीक्षक , धुळे यांचे मार्गदर्शनाखाली स्था.गु.शा. चे पो.निरी. हेमंत पाटील, प्रकाश पाटील, संजय पाटील पोहेकॉ संदीप सरग, पंकज खैरमोडे, महेंद्र सपकाळ, किशोर पाटील, योगेश जगताप, मयुर पाटील, तुषार पारधी अशांनी केली आहे.

# भोकर तालुक्यात अनुदान वाटपास सुरुवात

## अनुदान पोटी ४१ कोटी आले : शाखाधिकारी उमेश नादरे

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भोकर येथील नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखेतून अनुदान वाटप करण्यात येत असल्याने समाधान व्यक्त होत आहे. या अनुदानपोटी ४१कोटी जमा झाल्याची माहिती शाखाधिकारी उमाजी नादरे यांनी दिली आहे. गेल्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे भोकर तालुक्यातील शेती खरडून गेल्या. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर केली. जून ते ऑगस्ट २०२२पर्यत नुकसान झालेल्या अतिवृष्टीचे नुकसान भरपाई देण्यासाठी १ऑक्टोंबर रोजी रक्कम जमा झाली .भोकर येथील मध्यवर्ती बँकेने दिवाळीपूर्वी अनुदान वाटपास सुरुवात केली असल्याने शेतकऱ्या समाधानाचा वातावरण पसरले आहे. आतापर्यंत जवळपास १२००० शेतकऱ्यांनी अनुदानाची रक्कम उचलल्याची माहिती देण्यात आली आहे. बँकेतून ८००० खातेदाराने प्रत्यक्ष बँकेमध्ये येऊन तर उर्वरित खातेदारांनी एटीएमव्दारे अनुदान उचलत आहेत. दैनंदिन व्यवहारात पिक विमा ,सहकारी पतपेढ्या या सगळ्याचा व्यवहार सुरळीत होत आहे.अनुदान उचलण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे. अपुरी जागा असूनही कर्मचारी रात्रीच्या नऊ वाजेपर्यंत बँकेचा दैनंदिन व्यवहार करत आहेत. बँकेत आलेल्या खातेदारांना तत्परतेने सुविधा मिळत असल्यामुळे समाधान व्यक्त होत आहे. बँकेमध्ये शाखाधिकारी उमाजी नादरे, वसुली निरीक्षक रमेश सोळंके, कॅशियर उमरे, मोईन पटेल, चेतन जाधव शिवा रामगीरवार, विठ्ठल जाधव हे बँकेत सेवा करत आहेत.

# संगमेश्वर महादेव मंदिर होतेय पर्यटनस्थळ

## महाशिवरात्रीनिमित्त भव्य यात्रोत्सव व कीर्तन सप्ताह



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील पहूर शेंदुर्णी मार्गावर पहूर गावापासून अवघ्या २ किलोमीटर अंतरावर देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेले श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर हे महाराष्ट्र राज्य शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ' क ' वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्र असून हे पंचक्रोशीतील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिराच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन मंदिराचे पुजारी तथा ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी विजयादशमीपासून आजन्म झोळीचा संकल्प केला आहे .या भिक्षा झोळीतून प्राप्त झालेल्या लोकवर्गणीतून मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास साधला जात आहे. या विकास कामांचा भाग म्हणून नुकतेच पोलीस दल आणि सैन्य दलाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज मैदानाचे दि.२०/११/२२ रविवार रोजी भूमिपूजन करण्यात आले असून मैदानाची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे. या मैदानाच्या सुशोभनासाठी तसेच श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर परिसर सुजलाम सुफलाम व्हावा यासाठी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, देवळी व गोगडी या नद्यांचे संवर्धन, स्वच्छता, नद्यांचे खोलीकरण, मंदिर परिसरातील संत निवास भक्त निवास, पाण्याची टाकी या वास्तूंचे संवर्धन व नूतनीकरण, नैसर्गिक प्रवाहांचे संवर्धन जोपासना करण्यात येत आहे. पहूर आणि पंचक्रोशीतील भाविकांनी या धार्मिक कार्यास सढळ हाताने मदत व सहकार्य करावे, असे आवाहन शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी केले आहे.

# केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीच्या औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी फिरोज शेख

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** केंद्रीय ग्राहक संरक्षण समिती चे सचिव तथा माजी सदस्य -भारतीय अन्न महामंडळ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय भारत सरकार एम. बी.जाधव पाटील यांचे यांच्या शिफारशीने व केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष ॲड. मिर्झा जावेद एन. बेग यांच्या हस्ते औरंगाबाद येथे केंद्रीय ग्राहक संरक्षण समिती औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी



फिरोज एच शेख यांची निवड करण्यात आली. ग्राहकांच्या हक्का विषयी असलेल्या आपल्या तळमळीला पाहून व समाजात कार्य समर्पित नेहमी तत्पर असल्याची दखल घेऊन आपल्या हातून ग्राहकांचे कल्याण घडो या भावनेने व अपेक्षेने केंद्रीय ग्राहक संरक्षण समिती औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी फिरोज एच शेख यांना केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष ॲड. मिर्झा जावेद एम. बेग यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन नियुक्ती करण्यात आली. यावेळी ॲड. सचिन चव्हाण, ॲड. अविनाश सानप, सय्यद अजरुद्दीन अहेमद, नितीन दांडगे, आकाश सपकाळ, जुनेद खान, अलीम पठाण सय्यद शफिक आदी मान्यवर उपस्थित होते.



# संत ज्ञानेश्वर महाराजांना भाविकांकडून सव्वादोन किलोचा चांदीचा टोप अर्पण

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यात येथील ज्ञानेश्वर महाराज मुर्तीवर तब्बल सव्वादोन किलोचा चांदीचा फेटा ( टोप ) अर्पण करण्यात आला आहे. कार्तिक एकादशीला रविवारी या चांदीच्या फेट्याची पालखीतून आपेगावी मिरवणूक काढण्यात आली होती. तदनंतर अभिषेक करुन रेखाताई महेश नलावडे व निवृत्ती शंकर औटे यानी विधिवत पूजन करून संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मूर्तीवर हा फेटा अर्पण केला. यावेळी संस्थानचे अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णू महाराज कोल्हापूरकर, माजी सभापती कांतराव औटे, भीमराव औटे, निवृत्ती औटेसह भाविकांची उपस्थिती होती.



# नादरपूर गाव दत्तक घेणार ; गटविकासधिकारी ढाकने

## विकासकामासाठी तालुक्यातील ग्रामपंचायत कटिबंद ; सरपंच सविता निकम यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यातील नादरपुर येथील विकास कामाच्या बाबतीत नेहमी चर्चेत असणाऱ्या गावात कन्नड तालुक्याचे गटविकासअधि कारी चंद्रहास ढोकने,यांनी यागावातील विकास कामे व चकाचक केलेला परिसर शुशोभिकरन ग्रामपंचायत चकचकित रंगरगोटी केलेले स्वचालय, या सर्व बाबिचा शनिवारी आढावा घेतला तसेच गुणवत्ता पूर्वक कामे निर्देशनात येताच नादरपुर गांव दत्तक घेण्यात येणार असल्याची माहिती मिळाली आहे. त्यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्यात स्वच्छ भारत मिशन अंतर्गत बांधकाम केलेल्या 2 मजली सार्वजनिक शौचालयाचा लोकार्पण सोहळा कार्यक्रम ही पार पडला.यावेळी केक कापून शौचालयाचे उदघाटन करून जागतिक शौचालय दिन पाळण्यात आला.
जि.प.शाळेतील विध्यार्थी यांनी सर्व ग्रामस्थ व अधिकारी यांचेसह शौचालयाचा वापर करणे बाबत जनजागृती फेरी काढण्यात आली.

जागतिक शौचालयाचे औचित्य साधून ग्राम पंचायत कर वसुली मोहीम राबविण्यात आली त्यात गावातून कर वसुली र.रु.10,3,325/- वसूल करण्यात आले.गटविकास अधिकारी यांचे हस्ते जि.प.शाळेच्या प्रांगणात "पेव्हर ब्लॉक"कामाचे उदघाटन करण्यात आले, तसेच सर्व मान्यवरांच्या हस्ते स्व.इंदिरा गांधी यांचे जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी गट विकास अधिकारी यांनी ग्रामस्थांना वेगवेगळ्या शासकीय योजनांची माहिती दिली व विकासासाठी नादरपूर हे गाव दत्तक घेत असल्याचे जाहीर केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सविता दिलीप निकम ह्या होत्या. आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष, शालेय समिती अध्यक्ष व सदस्य,तंटा मुक्ति अध्यक्ष, सदस्य, वि.वि.कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन, विद्यमान व्हा.चेअरमन, सदस्य, ग्राम पंचायतीचे कर्तव्यदक्ष ग्रामसेवक, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, आरोग्य सेविका, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पोलीस पाटील, कोतवाल, रोजगारसेवक, ग्राम पंचायत कर्मचारी, संगणक ऑपरेटर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने हजर होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच लक्ष्मण बळी, रामहरी निकम सर यांनी तर आभारप्रदर्शन पोपट फकीरराव निकम यांनी केले.



**अनेकवेळा विकासकार्यला अळथले येत असतात, विकास कार्यांची गुणवत्तामुळे गाव दत्तक घेणार . .**
श्री ढाकने पुढे बोलत होते की नादरपूर गावाचा राज्यात प्रथम क्रमांक आणण्यासाठी मी स्वत :प्रयत्न करणार असल्याचे सांगितले . ग्रामपंचायत कार्यलय चे सम्पूर्ण पधअधिकारी विकास काम मार्गी लावण्यसाठी नेहमी धडपड करतात, सरपंच उपसरपंच ग्रामसेवक आणी सदस्य यांच्या ही या विकास कार्यात मोठा मोलाचा वाटा आहे, तसेच पुढील अनेक विकास काम मार्गी लावन्यासाठी मदत करेल प्रत्येक कामात कष्ट करावेच लागतेच त्या शिवाय फळ भेटत नाही,तसेच त्यांचे हस्ते गावातील गुणवत्ता धारक कंत्राकदार श्री रामदास शेठ निकम, कुशल कारागीर दिलीप चौतमहाल, मशरूम उत्पादक दिनेश निकम, रमाई बचत गटाचे सदस्य यांचा सत्कार करण्यात आला .तहसील कार्यालयांतर्गत पुरवठा विभागाचे निरीक्षक श्री तोंडे यांनीही स्वस्त धान्य दुकांना विषयी माहिती दिली व अनेक ग्राहकांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या .



# आमदारांच्या हस्ते विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वैजापूर-गंगापूर मतदारसंघातील नेवरगाव येथे विविध विकास कामांसाठी आमदार रमेश बोरनारे यांनी मंजुर करून आणलेल्या 3 कोटी 60 लक्ष रुपये कामांचा भूमिपूजन सोहळा आज दिनांक 19 नोव्हेंबर रोजी संपन्न झाला.
जलजीवन 1 कोटी 26 लक्ष रुपये व नेवरगाव-चेंडूफळ 3 किमी रस्ता डांबरीकरण 2 कोटी 10 लक्ष रुपये कामांचे भूमिपूजन तसेच पाणद रस्ता 24 लक्ष रुपये कामांचे भूमिपूजन अशा एकुण 3 कोटी 60 लक्ष रुपये मंजुर झालेल्या विविध विकास कामांचे भूमिपूजन आमदार रमेश बोरनारे यांच्या हस्ते संपन्न झाले.
याप्रसंगी बाळासाहेबांची शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब जगताप, शिक्षक संतोष काळवणे , जि प सदस्य मधुकर वालतुरे, तालुकाप्रमुख राजेंद्र साळुंके, अनिल चव्हाण, भाजप तालुकाध्यक्ष कल्याण पा. दांगोडे, शहरप्रमुख पारस घाटे, मा उपसभापती महेंद्र गंडे, प. स. सदस्य बद्रिनाथ चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प पू रामलखनदास महाराज, उपतालुकाप्रमुख सोमनाथ भराडे, उपविभागप्रमुख रामनाथ पाटेकर, प्रविण वालतुरे, भाऊसाहेब बारहाते, बद्री अण्णा चव्हाण, रामनाथ तांबे, डॉ गणेश चव्हाण, ऋषीकेश मनाळ, सतिश हिवाळे, विष्णू मनाळ, वैभव मनाळ, अतुल निकोले, आप्पासाहेब पवार, सरपंच नारायण वालतुरे, श्रीमंत पा शिंदे, राजेंद्र पवार, चेअरमन सुभाष वालतुरे, शाईनाथ चव्हाण, सचिन नवले, सुदाम भडके, सोमनाथ गायकवाड, गणेश शिंदे, मधुकर शिंदे, ज्ञानेश्वर अमृते, ईश्वर जानराव, नंदू ढगे, जानकीनाथ पंढुरे, कृष्णाभाऊ वालतुरे, नामदेव आघाडे, दत्तात्रय पवार, शेखर वालतुरे, रविंद्र वालतुरे सर, सचिन वालतुरे, सर, ज्ञानेश्वर वालतुरे, दिपक पवार, दिनेश गायकवाड, गोकुळ पवार, किशोर पवार, रामेश्वर वालतुरे, आशुतोष वालतुरे, सचिन पवार, विष्णू पवार, डॉ सागर वालतुरे, गोकुळ गायकवाड, बापुसाहेब पवार, विजय पवार, अनिल शिंदे, अशोक अभंग, विलास पवार, राजेंद्र चव्हाण, बाबुराव राठोड, नाना काकडे, श्यामभाऊ भुसाळ, चांगदेव डिके, सुनिल हाडोळे, संजय हाडोळे, हरिभाऊ वालतुरे, काकासाहेब पवार, अशोक आघाडे सर्व बाळासाहेबांची शिवसेना प्रमुखपदाधिकारी, सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य व समस्त गावकरी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# वंचित बहुजन आघाडी खुलताबादतर्फे धरणे

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर यांच्या आदेशावरून औरंगाबाद पश्चिम जिल्हाध्यक्ष योगेश बन यांच्या सूचनेनुसार खुलताबाद तालुका अध्यक्ष मुक्तारभाई सय्यद यांच्या नेतृत्वात व सर्व सन्माननीय तालुका, शहर, सर्कल, शाखा पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने दिनांक २२ ऑक्टोबर २०२२ रोजी तहसील कार्यालय खुलताबाद येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.
संदर्भः मा मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०६ ऑक्टोबर२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार गायरान शासकीय जमिनीवरील अतिक्रमण धारकाचे अतिक्रमण हाटवण्याचे आदेश देण्यात आले असून त्या आदेशाला पुनर्विचार याचिका दाखल करून स्थगती देण्यात यावी करिता वंचित बहुजन आघाडी खुलताबाद तर्फे दि.२२ ऑक्टोबर २०२२ रोजी धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरी वंचित बहुजन आघाडी अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यास सदैव आपल्या न्याय हक्कासाठी प्रयत्नशील आहेत म्हणून वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष मुक्तार भाई सय्यद व सर्व सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यातर्फे आव्हान करण्यात येते की सर्व वंचित बहुजन समूहाला संघटित करून तालुक्यातील गायरान अतिक्रमण लाभधारकांनी तहसील कार्यालय खुलताबाद सकाळी १०:३० वाजता मोठ्या संख्येने आपली उपस्थिती दर्शवावी.

# धुळ्यात सर्वात कमी तापमानाची नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यात चार दिवसांपासून अचानक वाढलेल्या थंडीने शहरात चांगलीच थरथराट भरली आहे. शुक्रवारी मध्यरात्रीनंतर किमान 7 अंश सेल्सिअस वर आले आहे यंदाच्या हिवाळ्यातील हे सर्वात कमी तापमान आहे. उत्तर व ईशान्येकडून वाहणाऱ्या थंड व कोरड्या वाऱ्यामुळे तापमान घसरले आहे. काही दिवसांत आणखी कडाकाची थंडी वाढण्याचा अंदाज हवामान विभागाचा आहे.
थंडीमुळे नागरिकांची क्रीडा संकुल, जिममध्ये व्यायामासाठी गर्दी होत आहे. राज्यात नाशिक, महाबळेश्वर येथील तापमानात मोठी घट झाल्यानंतर सर्वात निचांकी तापमानाची नोंद धुळ्यात झाली आहे. 7 अंश सेल्सिअस इतके तापमान नोंदवले गेले असून हे सर्वात निचांकी तापमान असल्याचे सांगण्यात येत आहे. यामुळे हुडहुडी चांगलीच वाढली आहे. घराबाहेर पडताना नागरिकांनी उबदार कपड्यांचा वापर करावा लागत आहे. धुळे शहरात २ नोव्हेंबर रोजी किमान तापमान ९ अंश सेल्सिअस होते. त्यानंतर त्यात वाढ होऊन ते १३ ते १४ अंशांवर गेले. तसेच कमाल तापमानही ३२ ते ३३ अंश होते. त्यामुळे गारठा कमी झाला होता. मात्र आता दोन दिवसांपासून वातावरणात अचानक बदल झाला. गुरुवारी मध्यरात्री किमान तापमान ९ अंश होते. त्यानंतर शुक्रवारी मध्यरात्रीनंतर तापमान पुन्हा १ अंशाने घटून ८.२ अंशांवर आले. तर आज थेट 7 अंश तापमानाची नोंद झाली आहे. वाढल्या थंडीतही शहरातील विविध भागात नागरिकांची सकाळी फिरण्यासाठी गर्दी होत असून जिल्हा क्रीडा संकुलात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.



गुरुवार दि. 17 नोव्हेंबर 2022 वार रोजी करोडी येथील शिवसेना विभाग प्रमुख मंगेश भाऊ जाधव यांनी रात्री 9 वाजता सर्पमित्र लक्ष्मण गायके व दत्ता जाधव मामा भांजे घाणेगावकर यांना फोन करून सांगितले की, बाळूभाऊ गोल्हार यांच्या निवासस्थानी एक नाग आहे. सर्पमित्रांनी नागाला सुरक्षित पकडले. यावेळी ऋषिकेश जाधव,जितू जाधव, सोमेश गोल्हार, बाळू जाधव, शिवाजी जाधव, महेश जाधव, शरद गडगुळ यांनी मदत केली.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in